

विश्वनाथ खैरे

# दंदात की गाथा

विश्वनाथ खैरे

# वेदातली गाणी

आद्य भारतीय लोकसाहित्याची
मराठमोळी ओळख

संमत

संमत

# वेदातली गाणी

संमत प्रकाशन : ६
पहिली आवृत्ती
१९९६

**प्रकाशक**

उमादेवी खैरे : ©
संमत प्रकाशन
३७४ सिंध हाउसिंग सोसायटी
औंध, पुणे ४११ ००७

**मुद्रक**
संगणकी : ज्ञानमुद्रा
२२ आनंदाश्रम, बुधवार
पुणे ४११ ००२

छपाई : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,
आर्यभूषण भवन, ९१५/२, शिवाजीनगर
पुणे ४११ ००४.

तीस
रुपये

ISBN 81-85280-05-3

वेदांच्या आधी
गाणी गाणाऱ्या

*भारतातल्या बाया-बापयांना*

**जी तुम्ही गायिली गाणी**
**वाचविली वेदांनी**
**ती मऱ्हाटिया बोलांनी**
**लिहिली मियां ॥**

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| ० | भूमिका | ०१ - ०१० | |
| १ | अग्नी : अग्निसूक्त | १, | ५२ |
| २ | पहाटेच्या देवता : उषासूक्त | ४, | ५३ |
| ३ | सोनसळा सूर्य : सूर्यसूक्त | ७, | ५४ |
| ४ | वाहता वारा : वायुसूक्त | १२, | ५५ |
| ५ | गाईचं गाणं : गोसूक्त | १५, | ५६ |
| ६ | शेताजी-सीताई : कृषिसूक्त | १८, | ५७ |
| ७ | जलदेवता | २१, | ५८ |
| ८ | पावसाच्या देवा : पर्जन्यसूक्त | २४, | ५९ |
| ९ | बेडकांची प्रार्थना : मण्डूकसूक्त | २७, | ६० |
| १० | नदीसूक्त | ३१, | ६१ |
| ११ | प्रार्थना वाटदेवाची : पूषा | ३५, | ६२ |
| १२ | केसोबा : केशिसूक्त | ३८, | ६३ |
| १३ | जुळ्या जोडीचे गाणे : अश्विनौ | ४२, | ६४ |
| १४ | रात्रमाउली : निशासूक्त | ४६, | ६५ |
| १५ | विश्वकर्मा | ४९, | ६६ |

# भूमिका

वेद हे आद्य, भारतीय, लोकसाहित्य आहे.

वेद आद्य का, तर जगात वेदांइतके प्राचीन साहित्य इतर कोणत्याही समाजाचे, कोणत्याही भाषेत नाही.

वेद भारतीय, कारण त्याची रचना भारतीयांकडून, भारतात, भारतातल्या एका प्राचीन भाषेत झाली. ती भाषा वेद तोंडपाठ म्हणणारांनी टिकवली, वाढवली, व्यापक केली. ती हजारो वर्षानंतर आजही भारतीयांना थोड्या प्रयत्नाने समजू शकते. वेदांना भारतीय म्हणण्याचे आणखी महत्त्वाचे कारण, वेदांचा आशय भारतीय आहे; वेदात शब्दरूपात व्यक्त झालेला परिसर भारतीय आहे. भारतीय म्हणजे त्या काळातला भारतीय; आद्य भारतीय.

वेद हे लोकसाहित्य आहे. वेद आधी लोक-वाक्-मय, लोकवाङ्मय होते; पिढ्यान्‌पिढ्या ते पाठ म्हणणाऱ्यांच्या मुखानेच सुरक्षित झाले. त्याचे लेखी रूप शेकडो वर्षांच्या मुखी परंपरेनंतर अवतरले. विशेष म्हणजे वेद लेखी रूपात उपलब्ध असतानाही वेदाचे मुखी रूप हेच प्रमाण, श्रद्धेय आणि पठनीय मानले गेले.

मुखी रूपातले लोकवाङ्मय लेखी रूपात लोकसाहित्य होते. लोकवाङ्मयाच्या उद्‌गाराला मूळचे काही प्रयोजन असते, ते त्याच्या उद्‌गारानेच साध्य होते. लोकसाहित्य वाचणारा मात्र त्या प्रयोजनाच्या मर्यादा पार करून त्याचा विचार करू शकतो. लोकवाङ्मय-वेदाचे प्रयोजन, देवदेवतांची प्रार्थना व स्तुती हे होते; तर लोकसाहित्य-वेदाच्या अभ्यासकांनी त्याच्यावरून व्याकरण, भाषाशास्त्र, इतिहास, भूगोल वगैरे सिद्ध केले.

सध्याच्या कालात लोकवाङ्मय-वेदाचा पाठ मोठ्या व्यापक प्रमाणावर होत नाही. लोकसाहित्य-वेदाचा अभ्यासही मर्यादित वर्तुळामध्येच चालतो. जुन्या

काळापासूनच्या परंपरा जपणारी, त्यांना संस्कृतीचा मूळ आधार मानणारी, भारतीय जनता वेदांना मनोमन मात्र मानते. वेदवाक्य म्हणजे प्रमाण आज्ञा असा शब्दप्रयोग भारतीय भाषांमध्येच रूढ आहे. एके काळी वेदांचा पाठ करणारांनी 'वेद म्हणजे ज्ञान' असा अर्थ केला. धर्मविधी करताना वेदपाठ केलाच पाहिजे, त्याशिवाय विधी पवित्र होत नाही अशी धारणा त्या काळी शिष्ट समाजात पक्की होती. आता ती राहिली नाही, वेदांना मानवताविरोधी मानणारेही निघाले. तरी पण 'आमचे वेद, आमची पुराणे' या संहतींना गूढ भावाच्या आदराने समाज मानीत असतो. लग्नकार्यात 'वैदिक पद्धती'ला थोडा वरचा मान आहे. वेदमंत्र ऐकल्याने 'बरे वाटते' असे म्हणणारे अनेक लोक आजही भेटतील; त्यांना त्या मंत्रांचे शब्दसुद्धा पूर्णपणे समजलेले नसतात तर त्यांचा अर्थ कळणे लांबच. श्रद्धाळूंची ही स्थिती असल्यावर अश्रद्धांच्या वेदज्ञानाची कल्पनाच केलेली बरी. श्रद्धा-अश्रद्धा बाजूला ठेवून वेदांचा अभ्यास करणारांनी, भाषा, इतिहास, तत्त्वज्ञान इत्यादी विषयांतले निष्कर्ष काढले आहेत. ते सामान्य जनांपर्यंत विशिष्ट धारणांच्या रूपात धुकटपणे पोचलेले आहेत. निष्कर्ष किंवा दावे वेदातल्या एका एका शब्दावरून, मंत्रावरून, फार तर लहानमोठ्या सूक्तावरून काढलेले असतात. वेदांच्या आशयाची पूर्ण ओळख त्यांतून होत नाही. लोकभाषांमध्ये समग्र वेदांचे अनुवादही झालेले आहेत. ते गद्यात आहेत आणि बहुधा प्रौढ, संस्कृतप्रचुर असे आहेत. त्यांत वेदाचे लोकवाङ्मयरूप बरेचसे हरवून जाते.

त्या रूपाची तोंडओळख करून देण्याचा 'वेदातली गाणी' हा यत्नप्रयोग आहे. वेदातली गाणी विविध विषयांवरची आहेत. परंपरागत भाषेत, ती वेगवेगळ्या देवदेवतांची सूक्ते आहेत. त्यांमध्ये देवांच्या स्तुती किंवा प्रार्थना आहेतच. देवपूजनाचा त्या काळातला प्रकार म्हणजे यज्ञ, त्याचेही संदर्भ त्यात आहेत. पण परंपरेने मानल्या-प्रमाणे तेवढाच त्यांचा आशय नाही. त्यांतली भावभक्ती सामान्य जनांची आहे. ती ज्या जीवनाशी गुंफलेली आहे तेही सामान्य जनांचे आहे. वेद चार आहेत. त्यांतला प्रमुख आणि प्राचीन, ऋग्वेद. ऋग्वेदात १०२८ सूक्ते आहेत, त्यांतली २६६ एकट्या इंद्राविषयीची आहेत. अशाच चाळीसपन्नास देवांची कमीअधिक सूक्ते ऋग्वेदात संग्रहित आहेत. म्हणजे वेदांचे स्वरूप तसे संकीर्णच आहे. संकीर्णता हाही लोकवाङ्मयाचाच विशेष असतो. त्या संकीर्णतेत लोकमानसाचा धागा कसा सहजपणे गोवलेला आहे हे येथे गाठवलेल्या संकीर्ण गाण्यांवरूनही अनुभवता येईल.

ऋग्वेदातले अगदी पहिले सूक्त (गाणे) नऊ कडव्यांचे (मंत्रांचे, ऋचांचे) आहे.

ते अग्नी देवाविषयी आहे. त्यात यज्ञाचा वगैरे संदर्भ आणि उल्लेख आहेच. मात्र त्याच्या शेवटच्या दोन कडव्यांमध्ये अगदी घरगुती मायाभाव व्यक्त झाला आहे तो गद्य भाषांतरात किंवा अर्थविचारात देव-यज्ञ-पुरोहित यांच्या मानाने मागे पडतो. 'तो झळाळतो, यज्ञ राखतो, न्यायाची ज्योत जागवतो' – हे त्याचे मोठेपण आहे; 'वाढता आमच्या घरी' हा कवीच्या मनाला भावणारा त्याचा विशेष आहे; तो शेवटच्या कडव्यात आणखी स्पष्टपणाने व्यक्त झाला आहे : अग्ने, बाप जसा बाळां। छान भेटी आम्हांस दे। सोबती सुखदायि हो. येथे अग्नी देव रहात नाही, मायाळू बाप होतो; यज्ञाचा गंभीर पुरोहित नसतो, बरोबरीचा सोबती होतो. शेकडो वर्षांनंतर ग्यानबा-तुकारामांसारखे लोककवी 'बाप रखुमादेवीवर' किंवा 'विठाई माऊली' म्हणतात त्यांचीच भावना या कोरड्या वाटणाऱ्या संस्कृत सूक्तात व्यक्त झालेली दिसते.

दाहक अग्नीला प्रेमळ बाप म्हणणाऱ्या वेदातल्या लोककवीला, रात्र संपता पहाट येते, तीही 'आकाशाची बाळी' किंवा 'स्वर्गाची मुलगी' वाटते. भरल्या घरच्या लेकीसुनेसारखी ती नटून थटून रथात म्हणजे गाडीत बसून येते. ती लोकसमाजरूपी लहान भावंडांना किंवा धाकट्या दीरनणंदांना 'मोप धन' घेऊन येत आहे. तरी ती देवी आहे याचीही जाणीव गाणे म्हणणाराला आहे.

तिच्या पाठोपाठ सूर्यदेव येत आहे. येतोय तो सोन्याच्या रथातून. धनंतर देव तो. चंद्र आणि तारे त्याच्या चमकदार रथाचे खिळे झाले आहेत. त्याचे हात आणि डोळेसुद्धा सोन्याचे, तेजस्वी. अंधाराच्या राक्षसांना तो निरवीत येतो. अर्थात त्याचा मार्ग अंतराळातला आणि म्हणून बिनधुळीचा आहे. तो आमचा पोसता, पाळता आहे, म्हणून देव आहे.

सूर्य डोळयांना दिसतो तरी. पण सूर्य असताना आणि नसतानाही वाहणारा, वारा. त्याचा घोष ऐकू येत असला तरी त्याचे 'रूप दिसेनासे' आहे. गाण्यात त्याचे वर्णन मात्र त्याच्या दिसणाऱ्या परिणामांवरून केले आहे. तो धरित्रीची धूळ उडवत जातो; वनस्पतींना आपल्या पाठीमागे वळवतो. कवीच्या समाजपरिसरातल्या तरुणी वीरापाठी धावतात तशा या वनस्पती जणू वाऱ्यापाठी लागतात ! वारा साऱ्या जगाचा प्राण आहे, देवांचाही आत्मा आहे !

पण लोककवीला तो त्याच्या गाईंना सुखविण्यासाठी हवा आहे, एवढे त्याचे गाईवासरांवर प्रेम आहे. अग्नी, पावसाचा देव, इंद्र, प्रजापती सगळ्यांना गाईवासरांच्या संबंधातली बारीकसारीक हिताची कामे दिली आहेत. त्या देवांना वाहायचा सोम दुधात बनवीत. म्हणून 'अंगभाग देती देवतांच्या साठी' अशी गाईची भलावण आहे. 'आम्हां

वाढविती दुभत्याने' म्हणून त्या घरच्याच होतात. त्यांचा गोठा हा घराचाच भाग आहे म्हणून,' त्यांच्यासह 'राहू एकमेळे मुलाबाळांनिशी' अशा जीवनाची आस गाण्यात व्यक्त होते.

त्या जीवनासाठी शेती हा एकच 'धंदा किंवा व्यवसाय' वेदकालीन लोकांना माहीत होता. (शेती शब्दाचा मूळ अर्थ धंदा, व्यवसाय हाच आहे.) त्या शेतीच्या देव-देवींचं जोडपं शेताजी-सीताई यांचं. त्यांच्याच जिवावर शेतकऱ्यांची जैत होते. प्रत्यक्ष अंगकामाला जोड लागते गाई-बैल-घोड्यांची, नांगराची आणि आसुडाची पण! गाईनी पाण्यासारखं दूध तूप द्यावं आणि शेताजी-सीताईंनी 'बरसावं गाईच्या धारेवानी.' त्या पावसानं, शेत नांगरणाऱ्या फाळांनी आणि देवांच्या जोडप्यानंही कल्याण करावं शेतकऱ्याचं अन् त्याच्या बैलांचं.

शेतकरी आणि बैल खपतात धरणीवर पण कल्याणाच्या इच्छा करतात पाण्याच्या जिवावर. म्हणून ते शेतातल्या सीताईसारखीच पाण्यातल्या मावलायांचीही गाणी गातात. 'पाण्यात अमृत पाण्यात औषधी । पाण्याच्या आरती देवही करीती' असं म्हणतात. पाण्याच्या देवता सूर्याच्या जवळ आहेत असं ते मानतात —बहुधा हे जाणतात की सूर्यच धरित्रीवरचं पाणी वर नेतो आणि तेच ढगांमधून बरसतं.

त्यासाठी 'पावसाच्या थोर देवा मंत्र गावे' असं त्यांना वाटतं. मात्र त्या देवाची कल्पना ते आपल्या स्वत:च्या परिसरावरून करतात. म्हणून सांगतात : हा पाऊस 'बैल डरकत यावा तसा येतो!' किंवा मानतात, 'घोडे आसुडाने सारथी दौडवी । तसा हा. ढगांनी पाऊस पाडवी.' त्यांच्यात ओढ्यानदीचं पाणी पखालीनं घरोघरी घालण्याचा रिवाज काही ठिकाणी असायचा. त्यावरून देवाला मागणं घातलं, 'पखालीचे तोंड मोकळे करावे । उंच खोल जग सपाट भरावे.' पाऊस भरपूर झाला, 'खाण्यापिण्या झाले मोप अन्नपाणी.' आता त्यांचं समाधान झालंय. म्हणून पावसाला शेवटी सांगतात, 'कोरड्या देशांना जाई तू पुढारा !'

केवळ स्वत:च्याच लाभाचा लोभ न धरणाऱ्या त्या लोकांच्या सांगण्याला जणू मान देऊन पाऊस कोरड्या देशाला जातो आणि पहिल्याच पावसाच्या धारापाण्यांनी त्या देशाला कोटी कंठ फुटतात. बेडकांच्या गळ्यांतून गावारानातली तळी गाऊ लागतात. वेदवाणी बोलणाऱ्या मंडळींना वाटतं 'जणू ब्राह्मण हे व्रती' पावसाची आवडती गाणी गाताहेत. बेडकांच्या आणि ब्राह्मणांच्याही गाण्यात त्यांना रात्रंदिवस ओळखीचे असलेले गायवासरांचे अन् बकऱ्याकोकरांचे स्वर ऐकू येतात. म्हणून ते

बेडकांनासुद्धा 'खोंडसुरे कोणी मेंढसुरे कोणी । ठिपकेवाले कोणी आणि लिंबूरंगी कोणी' म्हणून ओळखतात.

मग पावसाळाभर पाऊस येत राहतो, पाणी वाहायला लागतं, ओढे नाले नद्या भरून सू सू करीत धावू लागतात. त्यांचं पाणी पावसाळ्यानंतरही येतच राहतं आणि नदीकाठावर शेतं मळे पिकवतं; दुभती व औती जनावरं पोसते. साहजिकच त्या नद्यांचेही उपकार ते लोक गातात; यज्ञशाळेत इतर देवांच्या बरोबर नद्यांचाही महिमा आळवतात. नद्यांत नदी सिंधू, पन्नास नद्यांची लढाऊ पुढारी. तिचा आवाज गंभीर. 'डरके वळू का, तशी सिंधु वाहे'. वळूच्या फक्त आवाजाशी साम्य. एरवी 'नद्यांची नदी माय सिंधू दयाळू । स्त्री देखणी का तुरगा सुलक्षणी.' तीही भरल्या रथातून येते. तिच्या दोन्ही काठांवर 'पाडे, मळे, नांगर जुंपलेले.'

अशा समृद्ध देशामधून, वरुणानेच करून दिलेल्या वाटेने, त्या सिंधूचा रथ निर्विघ्न धावत जातो. पण त्या देशाचे रहिवाशीच प्रवासाला निघतात तेव्हा सतराशे विघ्नं वाटेत आडवी येतात. त्यासाठी त्यांना वाटदेवाची प्रार्थना करावी वाटते. त्यांच्यातल्या फिरत्या पशुपाळांना लांडग्याची धास्ती आहे. ते म्हणतात, 'दुष्ट खाष्ट... वाटेतून पिटाळ तो.' मळेकऱ्यांना 'कपटी पुंड चोरट्या वाटमाऱ्यांची, दुराचारी चोरांची' भीती आहे. ते वाटदेवाला सांगतात, 'पायाने तुडवी खटा.' वाट चुकेल का काय अशी पाल चुकचुकते आहे; प्रांजळपणे सुचवतात, 'शत्रू ने आडवाटेला । आम्हा सोपा सुपंथ दे.' हा सुपंथ शेती संस्कृतीतला आहे. 'राईमळयातुनी नेई । वाटेने त्रासही नसो.'

अशा नित्रास वाटेने राई-मळ्यातून प्रवास करणाऱ्याला धरणीवरचे राई-मळेच फक्त दिसतील, अरण्य-पर्वतसुद्धा पाहायला मिळणार नाहीत. आकाशात कधीमधीच उपटणारे एक 'केसाळ' तेज मात्र 'करी जगाची पाहणी' अशा थाटात 'वारेगतीने चालले' आहे असे भासते. ते तेज म्हणजे शेंडेनक्षत्र, धूमकेतू, केतू किंवा 'केसोबा'. केशी हे वेदातलं त्याचं एक नाव. या अत्यंत प्रभावी आणि विलक्षण तेजाचं वर्णनही केवळ 'वाटण्या'च्या पातळीवरून कृषिगोपालक लोकसंस्कृतीच्या संदर्भातच आले आहे. केसाळ भासणाऱ्या रूपावरून केसोबाला जटाजूटवाला मुनी म्हटले. पण हे मुनी शेतात राबणाऱ्यासारखेच 'मळे धडुते ल्यालेले' आहेत. या तेजाच्या विरळपणावरून त्याला 'वारियाचा घोडा सखा' म्हटले. 'वायूने तो घुसळिला, धरणीमाईने पीटला' अशी त्याची लोकमनाला भावलेली अवस्था.

केसोबा कधीतरीच दिसतो तरी पिढ्यान्‌पिढ्या त्याच्या कवतिकाच्या गोष्टी चालू राहतात. रोज रात्री आकाशात चमचमणाऱ्या चांदण्या लोकजीवनाचा भागच

होऊन गेल्या होत्या. दिव्यासारख्या लुकलुकत्या म्हणून त्या देवदेवता होत्या आणि धरतीवर माणसाचा तसा आकाशात देवांचा समाजच जणू वसला होता. त्यांच्या रंगरूपांवरून, चित्रांसारख्या मांडणीवरून या खालच्या समाजानं त्यांना वेगवेगळी नावंही दिली होती. अशाच एका दिव्य दुकलीला त्यांनी नाव दिलं होतं 'अश्विनजोडी'. या देवजोडीचं स्तवन करताना वेदकवीला स्वतःच्या शरीरातल्या, घरातल्या, परिसरातल्या तसंच व्यापक विश्वातल्या सत्तावीस जोड्यांची आठवण झाली ! पाटा-वरवंट्यापासून पृथ्वी-आकाशापर्यंत पोचणारी लोकवाङ्मयी प्रतिभा जुळ्या जोडीच्या गाण्यात वागर्थांच्या जुळ्यालाच खेळवीत चालली आहे.

दिवसरात्र हे असेच विश्वभरे जुळे. दिवसाचा धनी सूर्य, अग्नी. त्याला पहिलीच बापाची पदवी दिली. मग रात्र माऊली झाली. 'ती आत्ता आमची । विसावलो तिच्या कुशी । जशी पाखरे झाडाशी' ही उत्कट भावना गाण्याच्या मध्यावर डवरून आली. त्या अंतरंगात उतरण्याच्या पहिल्या पायरीवर तिचं बहिरंग भावतं : 'रात्र ऐसपैस । जगा चांदण्यांनी पाहे । सारी लक्ष्मी ल्याली आहे.' ती अमृताई आहे. सारे जग भरून राहिली असली तरी आपल्या पाठी धाकटी उषा येणार आहे हे जाणून तिलाही ती सजवून आणीत आहे.

हेवादेवा नाही, नेमलं वागणं वागायचं अशी साऱ्यांची रीत आहे. वेदकवींनी त्या रीतीला ऋत म्हटलं. ऋताच्या चालीरीतीनं रात्रीमागून उषा आणि उषेमागून सूर्य येतो. जग उजेडानं भरतं. सूर्य आपला आपणच चळवळतो असे नाही, सगळ्या जगालाच चेतना देतो. तरी विशाल अवकाशात कितीशी जागा व्यापतो ! म्हणजे विश्वात आणखीही जगं जागवायला भरपूर जागा आहे. यातूनच भारतीय लोककवीला प्रश्न पडला, 'ज्याने ही सगळी जगे चेतवीली । .. कसली होती त्याची बैठक, साधन कोणते, आणिक स्वतः कसा कोण?' तो जो कोणी असेल त्याला कवीनं नाव दिलं विश्वकर्मा —सर्व काही करणारा. तो दिसत नसला तरी त्यानं उभं केलेलं वस्तुमय वास्तुशिल्प समोर उभं आहे. त्याचं सामान कुठून आलं? 'कोण्या वनी वृक्ष कोणता तो होता । ज्यातून कोरिले स्वर्गाला पृथ्वीला.'

लोकवाणीतले प्रश्न असे आपल्या संस्कृति-परिसराच्या परिघातले असतात. जीवन जगण्यासाठी समाज असल्या प्रश्नांची कामचलाऊ उत्तरं काढून विश्वकर्म्याशी वागण्याची रीतही ठरवतो. वेदकालीन भारतीय समाजानं यज्ञाची रीत काढली. विश्वकर्म्याला अग्नीतून हवी किंवा आहुती द्यायची. ती स्वीकारण्याचं आवाहन करायचं. त्याची स्तुती करायची, प्रार्थनाही करायची : 'त्याने आमच्या साऱ्या सेवाव्या

आहुती । कल्याणी सत्कर्मी सांभाळो आम्हासी !'

देवाच्या संबंधातला वेदातला भक्तिभाव असा साध्या भोळ्या स्वरूपाचा आहे. तो वेदात आढळणाऱ्या जीवनाच्या दर्शनाला साजेसाच आहे. त्यामुळे 'वेद म्हणजे ज्ञान, वेदान्त म्हणजे परम अध्यात्मिक ज्ञान' असे मानणारी भारतीय परंपरा आणि 'इंद्र म्हणजे मूळचा आक्रमक आर्यांचा मानवी नेता' असे सांगणारी आधुनिक इतिहासकारी, या दोन्ही पूर्वग्रहांच्या काचा दूर ठेवून डोळसपणे वेदांचे वाचन केले तर या लोकवाङ्मयाचे आपले आकलन बरेच निर्मळ होईल.

ते मूळ वेदाच्या वाचनाने करून घेणे सामान्य वाचकाला शक्य नाही. त्याच्यासाठी स्वभाषेतला अनुवादच हवा. काव्यरूपातील लोकसाहित्याचा अनुवाद गद्यरूपात केला तर मुळातली खुमारी बरीच कमी होते. तोच काव्यरूपात करता आला तर 'अनुवाद' (मागोमाग म्हणणे) या संज्ञेला अधिक पात्र होईल. वेदमंत्रांचा अनुवाद करताना भाषेची अडचण असतेच. तिच्या जोडीला संस्कृती आणि परिसर यांच्या भिन्नतेची अडचण असते. 'होता' (यज्ञातला एक पुरोहित) या शब्दाचा अनुवाद करताना दोन्ही अडचणी उभ्या राहतात. आजच्या भाषेत 'होता' हे क्रियापद आहे आणि आजच्या संस्कृतीत होता कुठे आढळत नसल्यामुळे त्याला पर्यायी, रूढ शब्दही नाही. अशा वेळी काव्यानुवादात 'होता' हाच शब्द वापरून थोडेफार स्पष्टीकरण गद्यातही द्यावे लागते.

सुदैवाने, यज्ञासारखा विधी सोडला तर, संस्कृती-परिसरांच्या इतर वर्णनांबाबत फार अडचण येत नाही. कारण, वेदमंत्रातल्या शेतकरी—पशुपाल जीवनांचा आढळ काही प्रमाणात अजूनही आपल्याला शहरांच्या जकातनाक्यापलिकडे किंवा खेड्यांच्या वेशीबाहेर होऊ शकतो. निदान वेदातल्या तपशिलांचा अनुवाद करण्याजोगे शब्द या वर्तमान समाजांच्या भाषाबोलींमध्ये आढळू शकतात. मराठीतले लोकसाहित्य याच समाजांच्या लोकवाङ्मयाचे संकलन आहे. त्यामुळे काव्यानुवादात मराठमोळी भाषेचा वापर इष्ट ठरतो.

भाषा मराठमोळी आली की छंदही मराठमोळाच अनुरूप होतो. वेदातले छंद फार गुंतागुंतीचे नाहीत आणि ते गाण्याची परंपराही आहे. त्यामुळे साध्या लयीचा मराठी छंद उपयोगी ठरतो. वेदातल्या गाण्यांसाठी योजलेले छंद साध्या लयीचेच पण शक्य तितके मुळाच्या जवळचे असे आहेत. काही गाण्यांचे चरणसुद्धा मूळ संस्कृत मंत्रातल्या त्या त्या चरणांच्या जागी म्हणता येतात. या उल्लेखाने अनुवादकाचे रचनाकौशल्य दाखवायचे नसून, वेदमंत्रांची रचनासुद्धा लोकवाङ्मयाला किती जवळची आहे हे निदर्शनास आणायचे आहे.

लोकवाङ्मयातले शब्द अनेक पिढ्यांच्या प्रवासात काही बदलतही जातात. वेदमंत्रांच्या बाबतीत मात्र चारएक हजार वर्षांत असा बदल झालेला नाही असे मानतात. समाजाने इतक्या कसोशीने जपलेल्या साहित्याच्या अनुवादकानेही त्या जपणुकीचा आदर केला पाहिजे. अनुवादित गाण्यांमध्ये हे पथ्य पाळले आहे. अनुवाद होता होईल तितका शब्दशः केला आहे, इतकेच नाही तर जेवढ्या जागी शक्य झाले तेवढ्या जागी शब्दांचा क्रमसुद्धा मूळ मंत्राप्रमाणे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. वेदकाळी वेदातल्या संस्कृतप्रमाणेच इतरही लोकबोली अस्तित्वात होत्याच. वेदमंत्रांच्या आशयाची गाणी त्या लोकबोलींमध्येही असतीलच. त्या लोकबोलींमध्ये आजच्या मराठीसारखी एखादी बोली असती तर ती गाणी जशी असती तशी ही 'वेदातली गाणी' असावीत अशी मनींची इच्छा आहे.

आकाशवाणीच्या जमान्यातून अवकाशवाणीच्या युगात शिरलेल्या मराठी समाजाची भाषा-संस्कृती झपाट्याने बदलत असल्यामुळे वेदमंत्र आणि 'वेदातली गाणी' या दोघांचेही पूर्ण आकलन आजच्या मराठी वाचकाला होण्यासाठी त्यांच्या आशयाविषयी भोवतालची माहिती पुरविणे जरूर वाटले. त्याप्रमाणे प्रत्येक गाण्याला टिपणही दिले आहे. गाणे आणि टिपण मिळून मूळ मंत्रांची पुरेशी ओळख होईल. तरीसुद्धा वेदवाणीविषयीचे कुतूहल आणि काहीसा पूज्यभाव समाजात थोडाबहुत अस्तित्वात असल्यामुळे, मूळ संस्कृत मंत्रांचे पाठही शेवटच्या पानांवर दिले आहेत. वेदाच्या छापील प्रतींमध्ये उच्चारण आणि आघात यांची चिन्हेही दिलेली असतात. पण सामान्य वाचकाला ती गुंतागुंतीची वाटतात आणि नुसत्या वाचनाला त्यांची गरजही नसते म्हणून ती गाळली आहेत. मराठी गाणे, मग त्यावरचे टिपण वाचल्यावर संस्कृत मंत्राकडे वळता येईल. या प्रकारे नदीमुखाने समुद्रात शिरावे त्याप्रमाणे प्रस्तुतच्या अवघ्या पंधरा गाण्यांवरून, मूळ वेदाकडे जाण्याची वाचकाला ओढ वाटली तर या प्रयोगाचे सार्थक होईल.

या प्रयोगाचा जन्म ऋग्वेद समजून घेण्याच्या प्रयत्नातून झाला आहे. नुसत्या भाषांतरावरून समाधान न झाल्यामुळे, त्यासाठी सायणभाष्यासहित ऋग्वेद जो वैदिक संशोधन मंडळाने प्रकाशिला आहे त्याचा आश्रय घेतला. सायणाचार्य (इ. स. १३ वे शतक) हे महापंडित विजयनगरच्या राजाचे प्रधान होते. त्यांचे भाष्य परंपरागत अर्थांना धरून खूप विस्ताराने लिहिले आहे. आधुनिक अभ्यासकाला सायणभाष्यातला मंत्रार्थ पूर्णपणे पटला नाही तरी त्या अर्थाचे बोट धरून स्वतःची वाट चोखाळता येते.
तशी ती 'संमत' संशोधनाच्या प्रकाशात येथेही धरली आहे. वेदवाचनात त्याचे

लोकसाहित्य स्वरूप भावले ते वर विशद केलेच आहे. त्याचबरोबर वेदातल्या देवतांच्या मुळाशी कोणत्या गोचरांची मिथ्ये आहेत याचाही वेगळा शोध घेता आला. त्यातून केशी, अश्विन, सीता इत्यादी देवतांविषयीच्या आजवरच्या पंडितांच्या ज्या धारणा आहेत त्यांपेक्षा वेगळे आकलन झाले, ते टिपणांमध्ये निर्देशिले आहे.

ऋग्वेद हा विवेचक ग्रंथ नसल्यामुळे तो विशिष्ट क्रमाने वाचावा लागत नाही. तसा भाष्याच्या आधाराने तो वाचताना विशेष भावलेल्या सूक्तांचा अनुवाद करण्याचा चाळा सुरू झाला.

तो चालू राहण्याचे श्रेय, 'अवब हत्ती' हे मुलांचे दुभाषिक मासिक (आणि 'आजचा चार्वाक' हा आगळा वेगळा दिवाळी अंक) जिद्दीने चालू ठेवणाऱ्या मंडळींमधले सतीश तांबे यांना दिले पाहिजे. 'मुलांना आपल्या संस्कृतीची ओळख करून देणारे काहीतरी लिहा' हा त्यांचा नित्याचा आग्रह असतो. त्याला प्रतिसाद म्हणून 'जलदेवता' हे गाणे टिपणासह त्यांच्याकडे पाठविले, ते त्यांना आवडले आणि 'हत्ती'मधे त्यांनी छापलेही. मधून मधून आणखीही गाणी त्यांनी छापली आणि ती त्यांच्या परिचितांना व वाचकांना आवडत असल्याचा दिलासा दिला. त्यांच्या घरी यातली दोनचार गाणी वाचली तीही उपस्थितांना आवडली.

या गाण्यांचे लहानसे पुस्तक काढण्याआधी त्यांचा एक जाहीर कार्यक्रम करावा असे वाटले. सचीन रास्ते आणि यशोदा अवचट या तरुण गायकांनी तो समर्थपणे रंगवला. नुसत्या वृत्तपत्रीय निवेदनावरून आलेल्या श्रोत्यांची संख्या आणि दादही चांगली लाभली. श्रोत्यांमधल्या एका आजींनी सुरुवातीलाच आपण होऊन बैठकीसमोर रांगोळी काढली आणि अखेरीला डॉ. अनिल अवचट यांनी 'वेदात असे काही आहे हे आज कळले' असे सांगितले. ही गाणी श्रद्धाळूंना आणि बुद्धिवादींना सारखीच आवडतील अशी आशा यावरून वाटते.

तीस वर्षांपूर्वी मुलांच्या गाण्यांतून विज्ञान गाण्याचा प्रयोग केला. तो 'युगाणी' या नावानं प्रकाशित केला. त्यात 'चांदोबा चांदोबा येऊ का' म्हणणारा मुलगा आहे आणि सूर्याजी गोळ्याभोवती फिरत राहणाऱ्या नऊ लेकरांपैकी धरणी नावाची एक चिमखडी गोटी आहे. त्याच वेळी सुरू केलेला, इंग्रजी बाळगाण्यांना मराठमोळ्या गाण्यांच्या रूपात आणण्याचा प्रयोग 'इमराठी गाणी'-मध्ये साकार केला. परंपरेतल्या लोकवाङ्मयाच्या उपयोजनाने नवे लोकसाहित्य घडवण्याचे हे प्रयत्न होते. 'वेदातली गाणी' हे प्राचीन भारतीय लोकवाङ्मयाचे मराठी लोकसाहित्यातले रूपांतर आहे. एकविसाव्या शतकातील मराठी-विकासाची वास्तू लोकसाहित्याच्या पायावर आधुनिक

भाषिक-सांस्कृतिक साधनांचा व सामुग्रीचा उपयोग करूनच बांधता येईल. त्या भव्य भाव्य वास्तूतली, 'वेदातली गाणी' ही एक वीट होवो !

ती मुद्रांकित करण्याला मित्रवर्य वेदविद प्रा. अर्जुनवाडकर यांचा विज्ञ हात लागला आहे हे प्रसादचिन्हच मानतो.

औंध, पुणे ७ — विश्वनाथ खैरे

१६.१२.१९९५

# अग्नी : अग्निसूक्त

अग्निदेवास मी वानी  यज्ञाचा तो पुरोहित ।
होता, रत्नविराजित ॥ १ ॥

अग्नी जुन्या ऋषींनी  अन् वानावा नवख्यांनिही ।
आणी देवांस तो इथे ॥ २ ॥

अग्नीने मेळवी धन  वाढणारे दिनोदिन ।
कीर्ती अन् वीरसंतती ॥ ३ ॥

अग्ने, यज्ञ दयाशील  वेढितोस सभोवती ।
तो देवांनाहि पोचतो ॥ ४ ॥

अग्नी गाता, कवी, सत्य,  कृती कीर्तिमनोहर ।
देवां घेउन देव ये ॥ ५ ॥

अग्ने, तू यजमानाचे  कल्याण करशीलच ।
अंगारापरि सत्य हे ॥ ६ ॥

अग्ने, आम्ही तुला रोज  मनोभावे दिशीनिशी ।
वंदने नमने करू ॥ ७ ॥

झळाळे, राखतो यज्ञ,  न्यायाची ज्योत जागती ।
वाढता आमच्या घरी ॥ ८ ॥

अग्ने, बाप जसा बाळां, छान भेटी अम्हांस दे ।
सोबती सुखदायि हो ॥ ९ ॥

❑

अग्नी !

हा शब्द आपल्याला हल्ली 'अग्निशामक दला'च्या नावात ऐकायला मिळतो. अग्निशामक दल म्हणजे आग विझवणारे पथक. या पथकाच्या गाडीचं धूड ठण ठण ठण घंटा वाजवीत भरधाव जाताना आपण कधीकधी पाहतो. कुठंतरी आग लागलेली असते ती त्यांना आटोक्यात आणायची असते. कारण आग भयंकर असते. माणसाचा, मालमत्तेचा घास घ्यायला पाहते. तिचे चटके बसतात, ठिणग्या पडतात, हाळी उंचउंच जातात.

म्हणजे अग्नी आपल्याला जाणवतो तो त्याच्या मारक किंवा घातक रूपात. तेवढा थोडा वेळ आपण अग्नीचे उपकार विसरलेलो असतो. आपलं जेवण अग्नीनं शिजवून दिलं, आंघोळीचं पाणी त्यानंच गरम करून दिलं, रात्रीच्या अंधारात या ना त्या रूपात त्यानंच उजेडही दिला, इतकंच काय, आगीच्या बंबाचं इंजिन, पत्रा, टायर हे सारं बनवायलासुद्धा अग्नीनंच हातभार लावला हे सगळं तेव्हा आपण विसरतो.

पण तेवढ्यापुरतंच. त्याचा रोजच्या जीवनात वापर करतानाही आपण त्याला खास महत्त्व देतो असं नाही. पण जीवनातल्या महत्त्वाच्या वेळी मात्र आपण त्याला टिण टिण घंटी वाजवीत तुपाची धार घालतो आणि हात जोडून नमस्कार करतो. त्याच्या भोवती सात फेरे सुद्धा घालतो.

म्हणजे त्या वेळी अग्नीला आपण देव मानतो. आपले वाडवडील, खूप जुन्या काळातले आपले पूर्वज, तेही अग्नीला देव मानायचे. हे असं होमाला फेऱ्या घालून लग्न झालं म्हणजे हल्ली म्हणतात 'वैदिक' पद्धतीनं लग्न झालं. वैदिक म्हणजे वेदांत सांगितलेली. वेद हे आपल्या आधी पाचसहा हजार वर्षांपूर्वी भारतात जगलेल्या आपल्या पूर्वजांचे ग्रंथ. त्या वेदांत त्या जुन्या भारतीय ऋषींनी देवांच्या प्रार्थना, स्तुती, गुणवर्णने जी केली ती लिहून ठेवलेली आहेत. त्या प्रार्थनेच्या एकेका कडव्याला मंत्र म्हणतात आणि एकेका प्रार्थनेला सूक्त म्हणतात.

सूक्त म्हणजे सु-उक्त, चांगलं बोलणं, स्तुती, प्रार्थना... वेदातल्या एक हजार अठ्ठावीस सूक्तांमधलं पहिलं सूक्त आहे ते अग्नीचं! अर्थात सगळ्यात पहिली प्रार्थना करायची ती अग्नीची.

कारण अग्नी हा सगळ्या देवांतला पहिला आहे असं ते लोक मानायचे. पोटोबाची व्यवस्था लावणारा हा विठोबा सगळ्या देवांत पहिलाच मानला पाहिजे नाही का? आणि त्यामुळं त्या अग्नीलाही नैवेद्य दिला पाहिजे असं मानून ते अग्नीची पूजा करायचे. पुढे त्यांना वाटलं आपण या अग्निदेवाला जे काही देतो ते त्याच्या हाळी आकाशात घेऊन जातात. म्हणजे आपण दिलेलं जळण, आहुती, नैवेद्य—हा अग्नी

देवांना नेऊन देतो. चला, एका अग्नीला तुष्ट केलं की सगळे देव तुष्ट होणार. हा सगळ्यातला पुढारी देव म्हणाना. आपल्या घरात आहे, तरी जणू सगळ्या देवांना पाहुणे म्हणून आपल्याकडं घेऊन येतो! आपण या अग्नीला जळणासाठी समिधा म्हणजे चांगल्या झाडांच्या काटक्याकुटक्या घालू, आपण पाळलेल्या गोधनानं दूधतूप दिलेलं असतं त्याची आहुती देऊ. आणि अग्नीला म्हणू, तू आणि सारे इतर देव, संतुष्ट व्हा अन आम्हाला धनधान्य द्या, भरपूर मुलंबाळं द्या आणि सगळ्यांचं जगात नाव होऊ द्या.

ही पूजा-प्रार्थना करायला घरोघरीच्या चुलींमध्ये अग्नी असायचाच. आजच्या सारख्या आगपेट्या तेव्हा नसल्यामुळं चुलीमध्ये आगीचे निखारे राखेत पुरून ठेवलेलेच असत. तरीपण मोठी पूजाप्रार्थना करायची तर खूप मंडळी बोलावून यज्ञ करायचे. यज्ञ करणारा तो यजमान. यज्ञ यथासांग व्हावा म्हणून सूक्तं म्हणायला खूप ब्राह्मण बोलवायचे. मग पूजा करायची ती चुलीतल्या अग्नीची नाही. यज्ञासाठी वेगळी वेदी बनवायची. तिच्या चार दिशांना चार ब्राह्मण मंत्र म्हणायला असायचे. यजमानाचा प्रतिनिधी तो पुरोहित, देवांना आवाहन (बोलावणे) करण्याचे मंत्र म्हणणारा किंवा हवी (आहुती) टाकणारा तो 'होता'. या शिवाय 'ऋत्विज', 'अध्वर्यु' अशी नावे असलेले वेगवेगळी कामे करणारे ब्राह्मण असत. ते सगळे मिळूनच यज्ञ नीटपणे पार पाडीत, सगळ्या देवांना नैवेद्य, हवी, आहुती, स्तुती सारे काही पोचवीत. अग्नीच्या हातीच ना! म्हणजे झालं काय, की यज्ञापुरते यजमानाचे प्रतिनिधी जसे हे ब्राह्मण तसा देवांचा प्रतिनिधी अग्नी. आणि म्हणून अग्नीची स्तुती करताना म्हणाले, तू देवांचा ऋत्विज, होता, पुरोहित सर्वकाही आहेस! जुन्या ऋषींप्रमाणेच नव्यांनीही तुझी स्तुती करावीच. तू देवांना घेऊन ये, हवी त्यांना दे आणि या यजमानाला सुखसमाधान, धनदौलत, मुलंबाळं लाभू दे!

हे सारं आगीमधल्या अग्नी देवाला म्हटलं. समोर दिसतो तो झळाळणारा अग्नी. जणू रत्नं ल्यालेला. ठिणग्या उडवणारा. तेव्हा सूक्तात तेही वर्णन आलं.

तरी हे सगळं काहीसं दुरूनचंच बोलणं होतं. लांबच्या नातेवाईकाला किंवा एकाद्या अधिकाऱ्याला बोलावं तसं झालं. मायेच्या मायेनं रात्रभर घरात ऊब राखणाऱ्या अन दिवसभर पोटभर जेवायला देणाऱ्या अग्नीशी आणखी जवळचं नातं असतं आपलं. त्या नात्यानं अग्नीला म्हणाले, 'घरातच असतोस बाबा. म्हणून बाबा जसे मुलाला बाजारात बरोबर नेतात आणि छानसं बक्षीस पण घेऊन देतात—तसा वाग आमच्याशी.'

❑❑❑

# पहाटेच्या देवता : उषासूक्त

उजाळल्या उषा येती जशा लाटा
    पाण्याच्या फेसाळ उसळत्या
जग, मार्ग सारे सुगमऽ करून
    विशाल संपन्न दानदेत्या ॥ १ ॥

उषे तू भासते कल्याणी व्यापक
    फाकले किरण अंतराळी
देवी रूप खुले करिसी शोभिवंत
    भरपूर तेजाने दिवाळली ॥ २ ॥

वाहून आणती अरुणऽ किरण
    बखळ सुंदर हिला वाढतीला
हटवी आघाडीची चढाई शत्रूला
    तशी पळवीते उषा अंधाराला ॥ ३ ॥

सोपी तुला वाट अवघड डोंगरी
    सागरी तरऽशी अंगच्या तेजाने
पैसाच्या रथात आकाशाच्या बाळे
    आण आम्हासाठी हवी हवी दाने ॥ ४ ॥

रथ ना अडे जो घोडे लावलेला
    त्यात उषे धन भरी, प्रेमाने ये
स्वर्गाची मुलगी तू पहिल्या प्रहरात
    देवी पहावीशी पुजावीशी हो, ये ॥ ५ ॥

तू आली, उडाली घरटीची पाखरे
    निघाली माणसे पोटापाण्यासाठी
वाहून आणीशी उषे मोप धन
    तुला भजे त्याने दान देण्यासाठी ॥ ६ ॥

❑

काळी काळी रात्र संपायला आलेली असते. काळोख थोडा पातळ व्हायला लागतो. साखरझोपेतले डोळे किलकिले करून सभोवती बघितलं तर स्पष्ट काही दिसत नाही; पण अंधुकसं दिसायला लागतंय असं वाटतं. किट्ट काळोख आकसतोय, तोंडाला तोंड दिसतंय असं वाटायला लागतं. पहाता येण्याची वेळ व्हायला लागते. तिला म्हणायचं पहाट.

पहाट आपल्याला पहायला देते. ती काळोखातून न अडखळता जगावर येत राहते. कोवळाकोवळा उजेड घेऊन येते. जमिनीवरून येते पुसट पुसट. पाण्यावरून सुद्धा येते रमत गमत. पाण्यावरच्या लाटांना उजेडाचं बोट लावीत.

लहानशा गावात, थोडी छोटी बुटकी घरं, अन् चहूकडे मोकळी जागा. तिथल्या माणसांना पहाट होताना घडत असलेले थारेपालट सगळे जाणवायचे. अशा लहान गावात राहणारे वेदकाळातले आपले पूर्वज सगळ्या निसर्गातल्या घटनांच्या वेगवेगळ्या देवता मानायचे. म्हणून त्यांनी पहाटेची देवताही ठरवून टाकली—उषा. नेहमीच्या व्यवहारात बोलताना म्हणायचं 'पहाट झाली.' विशेष कल्पना चालवणारे मात्र म्हणत, 'उषा देवी उजेड घेऊन येतेय'. पहाट तर इथं तिथं, पुढं मागं चहूकडं दिसतेय. मग आणखी कल्पना चालवून म्हणायचे, 'हा तर उषा देवतांचा मेळाच येतोय म्हणाना.' अनेक अनेक उषा, त्यांना दाहीदिशा वाटा. या साऱ्या उषादेवी सूर्यदेवाच्या आधी येतात. आम्ही माणसं पहाटे उठतो म्हणण्यापेक्षा या उषा येऊन आम्हाला उठवतात, असं म्हणण्यात किती मजा आहे. मग त्यांची स्तुती करता येते, प्रार्थना करता येते आणि वाटल्यास त्यांना काहीकाही मागताही येते.

पहाटेनंतर 'तांबडं फुटतं'—म्हणजे पूर्वेच्या आकाशात लालसर नारिंगी असे रंग दिसायला लागतात. या उषांचा मेळा सैन्यासारखा पुढंपुढं चालत येऊन काळोखाला हाकून देतोय. त्या लढाईचंच आकाशातलं हे रंगीत रूप असेल वाटतं. उषांच्या सैन्यामागून राजे सूर्यदेव येणार आहेत. त्यांच्यासाठी या उषा पर्वतांवर आणि पाण्यावरही सहज चालत येतात. किंवा त्या रथांतून येत असतील.

पहाट झाली आहे. पाखरं चाऱ्यासाठी आणि माणसंही पोटापाण्यासाठी उठताहेत. पाखरं आकाशात भरारी मारणार आहेत. माणसं या उष:काली देवदेवतांची प्रार्थना करणार आहेत. त्या प्रार्थनेत उषांचं वर्णन करतील, त्यांची स्तुती करतील आणि त्यांना सांगतील, तुम्ही आकाशाच्या मुली, रथातून या, आम्हाला धन द्या, प्रेम द्या, आमच्यावर लोभ ठेवा. धनाचं आम्ही दान करणार आहोत, साठा नाही.

वेद रचणाऱ्या कवींनी उषादेवींची प्रार्थना करून ठेवली आहे. वेदांत उषेची आणखी सूक्तं आहेत. जगातल्या प्राचीन वाङ्मयात उषेचं वर्णन वेदातल्या उषासूक्तांइतकं सुंदर दुसरं आढळत नाही असं पंडितांचं म्हणणं आहे. पहाट रोजच होत असते. वेदकाळासारखीच आजकालही होत असते. आपण पहाटे उठून मोकळ्यावर जाऊन पाहिलं तर उषादेवी येताहेत असं आपल्यालाही वाटेल आणि वेदातली प्रार्थना आपल्यालाही म्हणता येईल.

□□□

# सोनसळा सूर्य : सूर्यसूक्त

बोलावतो आधी कल्याणी अग्नीला
मित्र-वरुण हे देव रक्षणाला
जग जोजवीत्या बोलवतो रात्रीला
पोसत्या पाळत्या सूर्याजी देवाला ॥ १ ॥

काळोखी वाटेने पुन्हा पुन्हा येतो
देवां माणसांना घरदार देतो
सोन्याच्या रथात त्रिलोकां पहात
सविता सूर्यदेव आम्हांपाशी येतो ॥ २ ॥

जातो वरती देव, जातो तो खालती
जातो यज्ञदेव शुभ्र घोड्यांवरी
दूरदेशाहून येतो सूर्यदेव
हारवीत पापे विश्वातली सारी ॥ ३ ॥

चहूबार चित्रे सोन्याची ज्यावर
दोर सोनियाचे, पैस भरपूर
रथीं त्या बैसतो सूर्य चित्रदेव
प्रकाशवळाने कापीत अंधार ॥ ४ ॥

जगात उजाळा, गोऱ्या पायीं घोडे
सोन्याच्या जुवाच्या रथात आणती.
नित्य जन देवदेव-सूर्यापाशी
आणि तिन्ही लोक घोटाळती ॥ ५ ॥

स्वर्गपृथ्वीलोक सूर्याच्या अंकित
मध्यलोकी यम पितरांचा पालक
सूर्याच्या रथाचे खिळे चंद्रतारे
बोला रे जो कोणी जाणतो हे सारे ॥ ६ ॥

तेजपंखी संथ जिवट झेपावे,
उजाळी त्रिलोका, वाटाड्याहि होये
आता तो कुठाहे सूर्य, कोण जाणे?
कुण्या देशी त्याची लोपली किरणे ॥ ७ ॥

आठी उजाळल्या दिशा धरणीच्या
तिन्ही लोक आणि समुद्र सातही
सोनियाच्या डोळां सूर्यदेव आला
यजमानां थोर रत्नराशी देई ॥ ८ ॥

सोनियाचे हात, नानारूपे ज्याची
स्वर्ग-धरे-मध्ये सविता तो चालतो
असुरा ज्या धाडी तो पुन्हा सूर्यास
पृथ्वीसही दाट काळोखे व्यापितो ॥ ९ ॥

सोन्याच्या हातांचा, प्राणसुखदाता
धनी नेता आता आम्हांपुढे यावा
भूल घालणाऱ्या राक्षसां निरवीत
रात्रीचा राहिला ऐकुनिया धावा ॥ १० ॥

सूर्यदेवा तुझे मार्ग जे प्राचीन
अंतरिक्षातले केले धूलिहीन
त्या सोप्या मार्गांनी आम्हांकडे यावे
रक्षणा करावे हिताचे बोलावे ॥ ११ ॥

❑

उजेड, अंधार, काळोख, ताऱ्यांची लुकलुक, पहाटेची अंधुकी, कोवळे किरण, सोनेरी सूर्य, पुन्हा उजेड... असं हे चालू आहे.

माणसाला ते दिसत आहे, सारं जग दाखवीत आहे. माणसाचं जगणं त्यातच चालू आहे. उजेडात तो काही ना काही करीत असतो, काय कशाच्या सारखं आहे पहात असतो. अंधारायला लागलं की आवरतं घेतो. काळोखात त्याला हुरहूर लागते. दुसऱ्याची सोबत हवीशी वाटते. तारे लुकलुकले की मन शांत होतं आणि या साऱ्याचं कुतूहल वाटतं. कळत कल्पना सुचतात. नकळत डोळे मिटतात. रात्र त्याला जोजावते. पहाट गुलाबी पावलांनी येते, जागवते. ताजंतवानं मन दिवसभरासाठी उत्साह भरून घ्यायला लागतं. त्या उत्साहात सूर्याशी संवाद करायला लागतं. त्या संवादात वेदकाळातला माणूस सूर्याला काय म्हणाला ते आपल्याला माहीत आहे. सूर्य त्याला काय म्हणाला कुणास ठाऊक; त्या माणसाचं म्हणणं समजून घेतल्यावर कळेल कदाचित.

तो वेदातला माणूस पायानं चालतच इकडेतिकडे जायचा. त्यातल्या त्यात धनवंत असला तर रथातून फिरायचा. रथात बसून दूरदूरचा प्रवासही करता यायचा. सूर्य तर केवढा मोठा प्रवास करतो. पूर्वेला उगवतो. वाटतं की या इथल्या डोंगरामागून येतो. पण त्या डोंगरापर्यंत गेलं तर तो आणखीच पलीकडं दिसतो. म्हणजे काय तर खूप लांबून येतोय. अन् पश्चिमेला मावळायला जातो तोही असाच लांब लांऽऽब कुठंतरी. एवढा मोठ्ठा प्रवास करायचा तर तो रथातच जात असणार!

रथ असा दिसत नाही, पण असणारच! दिसत नाही याचं कारण असं असावं की तोही फार चमकदार आहे. माणसं लाकडाचा रथ करतात; पण ऐपत असली तर त्याच्या खुंटल्यांवर, पात्यांवर, चाकांवर, जुवावर, चंदेरी सोनेरी रंग लावून तरी तो चमकवतातच ना! सूर्याला तर काय कमी? त्याचा रथ सरळ सोन्याचाच असणार!

माणूस रथात बसला तर दिसेल अर्धापाव कोसापर्यंत. हा रथातला सूर्य आकाशात, पृथ्वीवर, चहूकडे दिसतो. म्हणजे तो केवढा मोठा असला पाहिजे. त्याच्या रथात तशीच ऐसपैस जागा नको का त्याला? रथही मग प्रशस्त, लांबरुंद असायला हवा, नाहीका?

सूर्याचं सारं झळझळीत. म्हणून रथ जसा सोन्याचा, तसे रथाचे घोडेही पांढरे शुभ्र. त्यांचं अंग गोरं, त्यांचे पायही गोरे! प्रवासात न थकणारे.

प्रवासाला जायचं म्हणजे शिदोरी बरोबर पाहिजे. एवढ्या मोठ्या सूर्याला,

एवढी मोठ्ठी शिदोरी लागणार. या भल्यामोठ्या रथांतसुद्धा मावणार नाही ती. त्यापेक्षा सोनंनाणं रत्नंबिल्नं घ्यावीत. थोड्या जागेत राहतील आणि तेजच तेज उधळतील! ती देऊन खायला प्यायला घेता येईल.

कुणाकडून? वेदकाळातला माणूस म्हणतो, माझ्याकडून, आमच्याकडून! कारण आम्ही यज्ञ करतो, यज्ञाला सगळया देवदेवतांना बोलावतो आणि यज्ञकुंडातल्या अग्नीत त्यांना हवा तो 'हवी' टाकतो–अग्नीमधून तो त्या सगळयांना पोचतो!

त्यामुळं 'मामा काका जेवायला या हं आमच्याकडं' असं म्हटल्यासारखं देवांनाही यज्ञाला यायचं आवतणं देतात. रात्री दिसेनासा झालेला सूर्य उगवून आला की, 'मामा आला, मामी आली, मामाची गाडी आली' म्हणावं तसं, 'सूर्यदेव आला, सूर्याचा रथ आला, रथाचे घोडे आले' असा गोड गलका करतात. मग, मामा जसे खाऊ आणि भेटी आणतात तशाच सूर्यदेवानंही आणलेल्या असतात, असं समजून त्याच्याकडं लाडिक हट्ट करतात, 'देवा, तू आणलेली रत्नं दे ना आम्हाला! तुझे हात सोन्याचे, डोळे सोन्याचे, रथ सोन्याचा... पिवळयाधमक सोन्यासारखा आतबाहेर तेजस्वी तू, पुरव ना आमचे कोड!'

वेदमंत्रांचे कवी असे बालभावाचे आहेत. म्हणूनच लहान मुलांसारखेच प्रश्न त्यांना पडतात, 'दिवसभर हिंडत होता, वाट दाखवीत होता तो सूर्य रात्री कुठं बरे जातो?' बरोबर. सकाळी त्यानं काळोखाला पळवून लावलं, म्हणून त्या दुष्ट काळोख्यानं रात्री त्याला धरून ठेवलं वाटतं. पण सूर्य तर शूरवीर आहे. काळोखानं नव्हता त्याला धरला. आम्हाला काळोखाची नाही म्हटलं तरी भीती वाटते ना, त्यामुळं रात्री आमची राखण करायला म्हणून तो काळोखाच्या घरात दडून बसतो बरं का! त्याचा रथ मात्र आकाशात ठेवलेला असतो. त्या रथाचे सोन्याचे खिळे ना, रात्रीच्या काळोखातसुद्धा चमकत असतात, तेच तर चंद्रतारे! ठाऊकाय का तुमाला?

पण कधीकधी वाटतं, रथ चालतो जमिनीवर. मग सूर्य आकाशात रथातून कसा फिरत असेल? हां. रथ नको, रस्ता नको, घोडा नको–असं आपल्या आपण आकाशात भराऱ्या कोण बरं मारतं? अर्थात पक्षी. तेव्हा असं वाटतं की हा सूर्य भला दांडगा पक्षी आहे, त्याचे पंखच तेजाचे आहेत. लांबरुंद पसरलेले, प्रचंड. घार किंवा गरुड कसे, फार उंचावरून उडत असले की आपल्याला वाटतं ते संथ पण सावकाश जाताहेत. तसंच होतं या सूर्यपक्ष्याच्या बाबतीत. तो सबंध आकाशात झेपावतो; पण सावकाश धिम्या गतीनं चाललोय असं वाटतं.

रथातून असो की पक्षी होऊन असो, सूर्यदेव जातो तो मात्र ठराविक मार्गानं. म्हणजे, यंदा पाडव्याला ज्या वाटेने गेला त्याच वाटेनं गेल्या पाडव्याला गेला होता आणि पुढल्या पाडव्याला पण जाईल. यंदाच अन् कोणत्याही वर्षी पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी मात्र थोड्याशा वेगळ्याच वाटेनं जाईल. म्हणजे, ठरलेल्याच पण वेगळ्यावेगळ्या किती वाटा झाल्या पहा, फार फार वर्षांपासून! म्हणून आम्ही त्याला म्हणतो, 'सूर्यदेवा, तुझे मार्ग प्राचीन काळापासून तुझ्या माहितीतले आहेत म्हणून सोपे आहेत. आमच्या रस्त्यांसारखी त्यांच्यावर धूळही नाही. तेव्हा तू नित्रासपणे त्या मार्गांवरून आमच्याकडे ये. (खाऊ, भेटी, धन, रत्ने आणायला विसरू नकोस.) आमची सोबत कर. आमचंही बोलणं ऐक अन् आमच्याशी चार शब्द बोल. नाहीच ते जमलं, तर आम्ही काय म्हणतोय ते ऐकून घे, अन् तुझे मित्र जे इतर देव आहेत त्यांना आमचं बोलणं सांग आणि आम्ही बोलावलंय म्हणूनही सांग.'

□□□

## वाहता वारा : वायुसूक्त

वाहत्या वाऱ्याचा महिमा वानितों
नभवीत जाये तो, घोष निनादितो
आकाशा भिडे तो, दिशा धुंदवीत
जातो धरित्रीची धूळ उधळीत ॥ १ ॥

वारा वाहे तशा लवती वनस्पती
युवती वीरापाठी, तशा मागे जाती
जोडल्या रथाने देव चालला हा
अवघ्या जगाचाच राजा होउनीया ॥ २ ॥

अंतरिक्षातल्या मार्गांनी जायास
वसे ना थांवे ना एकही दिवस
पावसाचा सखा, नेमाचा, थोरला
कुठे जन्मा आला, कोठून धावला ॥ ३ ॥

आत्मा हा देवांचा, प्राण जगताचा
मना येई तसा देव हा फिरतो
घोष ऐकू येई, रूप दिसेनासे
त्या वायूदेवाला हवीने वंदीतो ॥ ४ ॥

वारा वाहू दे औषधी  हृदया जी सुखकल्याणी
आम्हा आयुष्यतारिणी ॥ १ ॥

वाऱ्या, जणू तू आमचा  बाप भाऊ आणि सखा
आम्हां होई जीवराखा ॥ २ ॥

वाऱ्या, तुझ्या घरी जो का  अमृताचा साठा आहे
आम्हां जगण्याला वाहे ॥ ३ ॥

❑

आपण असतो म्हणजे वारा असतो. तोंडापुढं हात धरला तर नाकातून तो हातावर येतो. अंगाभोवतीही असतो, जराशी हालचाल केली की कळतो. बाहेर जेव्हा तो वाहतो तेव्हा झाडांची पानं किंवा जमिनीवरची धूळ एका दिशेला वळतात. अन त्यांवरून तो वाहतोय हे समजतं.

असा हा वारा, वायू, वात सगळ्या जगात भरून राहिलेला पण डोळ्यांना न दिसणारा, माणसांचे जीवन ज्याच्यावाचून चालणारच नाही असा. त्यामुळं त्याला देव मानलं यात नवल काय?

वेदातल्या कवींनी मग वायुदेवाची गाणी रचली. त्याची वर्णनं केली, त्याला यज्ञाला यायची प्रार्थना केली, त्याला सुख संपत्ती आरोग्य मागितली.

कवीला वायूचा महिमा सांगावासा वाटतो. वारा वाहतो. पाण्यासारखा जमिनीवरून नाही. आकाशापर्यंत भरलेला असतो आणि याच प्रदेशात तो वाहतो. तो दिसत नाही, पण त्याचा सूं सूं, घों घों आणखी कसलाकसला आवाज येत असतो. डोंगरदऱ्यांना तो घुमवीत जातो अन वाटेत जे काय येईल त्याला आपल्या बळानं वाकवीत असतो, नमवीत जातो. साऱ्या दिशा धुंधुरक्या करून टाकतो. कारण जमिनीवरची धूळ वाहतावाहता उचलून ती तो सगळीकडे उधळून टाकीत असतो.

आणि जमिनीवरच्या झाडावेलींची काय स्थिती असते? वारा ज्या दिशेला चालला असेल त्या दिशेला सारी वाकतात, नमतात. पण त्याचा वेग मोठा. तो भरकन त्यांच्यापुढं निघून जातो. झाडं वेली मागं राहतात. पूर्वीच्या काळी शूर तरुण आपल्याला आवडलेली तरुणी हाताला धरून घेऊन जायचा. ती जशी त्या तरुणाच्या मागं असायची तशा झाडंवेली वाऱ्याच्या मागं राहतात.

वेगवान कुणीही असो, वेदकाळातल्या कवीला वाटायचं, त्याचा रथ असला पाहिजे. देवाचा तर नक्कीच. तेव्हा वायुदेवही रथातून जातोय. तो कुठेही जाऊ शकतो, म्हणजेच सगळ्या जगाचा राजा होऊन जातोय. त्याचा रथ पृथ्वीवरून नाही, आकाशातून नाही, सगळ्या मधल्या भागातून जातो. त्या भागाला अंतरिक्ष म्हणतात.

पण हा राजा वेगळा आहे. तो आळशी नाही. तो सारखा चाललेलाच आहे. एका जागीसुद्धा बसून राहत नाही. सगळ्यांच्या आधी जगात तोच आला. मग पाणी-पाऊस. पाऊस कुठे भेटला तर वारा त्यालाही आपल्याबरोबर नेतो, म्हणून तो पावसाचा मित्र आहे. पाऊस कसा ठरल्यावेळी नेमाने येतो. त्याच्यासारखाच वायूही नेमानं वागणारा आहे; जगाचा राजा असला तरी नियम पाळणारा आहे.

वायू माणसांचे जीवनच आहे. त्यावरून वायुदेव हा देवांचा आत्माच आहे असे म्हटले. जगात सगळीकडे असतो म्हणून त्याला जगाचा गर्भ म्हटले. गर्भ पार पोटात असतो आणि तो माणसाचा किंवा प्राण्याचा सुरुवातीचा आकार असतो. वायू जगाच्या संबंधात तसाच आहे असं कवीला वाटलं. याची चाहूल तेवढी लागते, रूप कधी दिसत नाही. दिसलं असतं तर सूर्यचंद्रांना करतो तसा त्याला नमस्कार केला असता. दिसत नाही म्हणून यज्ञात त्याच्या नावाचा 'हवी' टाकूनच त्याचं पूजन करू.

देवाला हवी दिल्यावर आपल्याला हवीशी काहीतरी गोष्ट मागून घेणं ओघानंच आलं. वायूला काय मागायचं? तो सारखा आमच्या शरीराच्या आतबाहेर करून हृदयाची टिकटिक चालू ठेवतो. तो नाही म्हणजे जीवन नाही. अशा देवाला हेच मागायचं की तू औषध होऊन ये अन् आम्हाला स्वस्थ, सुखी ठेव.

तू आम्हाला संभाळणाऱ्या वडिलांसारखा, बरोबर असणाऱ्या भावासारखा आणि आवडणाऱ्या मित्रासारखा; सर्व काही आहेस. तर आमचं जीवन चांगलं राहील असं करीत रहा.

वायुदेवा, तुझ्या घरी अमृताचा साठाच आहे. अमृत म्हणजे प्रत्यक्ष मरणावरचं औषध. आमचं जीवन तू चालू ठेवावंस, तुझ्या त्या अमृताच्या साठ्यातून चार थेंब आम्हाला द्यावेस!

## गाईंचं गाणं : गोसूक्त

सुखावता वारा वाहू दे, गायांना
    वळावता चारा चवीने खाऊ दे
पोसावते पाणी पिऊ दे, मायांना
    चौपायी चरताना रुद्रा तू माया दे ॥ १ ॥

सारख्या पारख्या कुणी एकवाणी
    अग्ने ओळखसी सगळ्यांना नावांनी
अंगारांची ऊब मिळतसे त्यांना
    पावसाच्या देवा दे भरपूर कल्याणा ॥ २ ॥

अंगभाग देती देवतांच्या साठी
    सोम जाणे त्यांची सारी रूपे किती
आम्हां वाढविती दुभत्याने, त्यांना
    इंद्रा, वासरांशी गोठ्याआत आणा ॥ ३ ॥

मला गाई देतो देव प्रजापती
    त्यास सर्व-देव-पितर-संमती
कल्याणी माउल्या येवोत घराशी
    राहू एकमेळे मुलाबाळांनिशी ॥ ४ ॥

❑

दिवाळी किती दिवसांची असते?

मुली म्हणतील भाऊबिजेच्या एका दिवसाची. वडील म्हणतील पाडवा अन भाऊबीज या दोन दिवसांची. व्यापारी म्हणतील लक्ष्मीपूजनापासून तीन दिवस. आया सांगतील नरकचतुर्दशीला पहिली आंघोळ असते म्हणून तेव्हापासून चार दिवसांची. भटजींचं मत : धनत्रयोदशीला धनाची पूजा करायची असते म्हणून त्या दिवसापासून पाच दिवस. खेड्यातला शेतकरी मात्र म्हणेल 'नाई दिवाळी मंजी काय मानसांचाच सन न्हाई. आन धन मंजी काय सोनंनाणंच नाय. आमचं धन म्हनाल तर गाई म्हशी, वासरं रेडकं ह्ये. म्हनून आमची दिवाळी चालू व्हते गायगोऱ्ह्याच्या बारशीपासून. त्या दिशी आमची पोरं घरूघर जात्यात अन गाणी म्हनून गाईवासरांला ववाळत्यात. दिन दिन दिवाळी । गायाम्हशी ववाळी । गाया कुनाच्या । रामलक्षिमनाच्या ।।'

राम, लक्ष्मण, गोपाळकृष्ण सगळे गाईम्हशी पाळणाऱ्या लोकांतलेच होते. ते लोक लहान लहान गावांमध्ये रहायचे. दूधदुभत्यासाठी हे धन जवळ ठेवायचे. आपल्या शेजारच्या कन्नड भाषेत, पाळलेल्या जनावरांना दन असंच म्हणतात आणि शेळ्यामेंढ्या पाळणारांना आपणही 'धन'गर म्हणतोच ना. शेती करायची रीत नव्हती त्या काळात तर, अशा 'धना'चे कळप किंवा खिल्लारं पाळायचे लोक. त्यांना रोज चरायला न्यायचं, दिवसभर गवतपाणी करायचं अन संध्याकाळी घरी घेऊन यायचं. त्यांच्यासाठी निवारा असायचा, त्याला म्हणायचे गोठा. थोडीच जनावरं असली तर गोठा पुरायचा. पण खिल्लारं पाळल्यावर त्यांना उघड्यावरच ठेवावं लागायचं. त्या जागेला वाडगं म्हणतात. वाडग्याला चहूकडून कुंपण असायचं. रात्री रानातल्या वाघलांडग्यांसारख्या प्राण्यांनी गुरांच्या वासानं कळपांवर चालून येऊ नये म्हणून ही तरतूद. काही काही लोक तर सभोवती खंदक खणून त्यात लाकडं पेटवून ठेवायचे. रानातले प्राणी आगीला भिऊन मागं फिरायचे.

अग्नीवर जेवणखाण शिजतभाजत होतं, उजेड मिळत होता; अग्नीमुळं रानटी जनावरांपासून गुराढोरांचा बचाव होत होता. हे सारं जाणवून लोकांनी त्याला देव म्हटलं. गाईच्या कळपाभोवती तो रात्रभर पहारा करतो म्हणून त्या गाई अग्नीच्या पक्क्या माहितीच्या होतात असं मानलं. गाईचं रक्षण कर अशी त्याची प्रार्थनाही करायला लागले.

रात्र सरून पहाट व्हायची. मंद वारा वहायचा. गाईंना रानात चरायला न्यायचं असे. गुराखी त्यांना घेऊन जायचे. वारा त्यांची सोबत करीत जायचा. रानात पावसानं

गवत वाढलेलं असायचं. इतरही सकस झाडपाले लवलवत असायचे. गाईंना पोटभर खायला मिळायचं. भरलेल्या तळ्यांतलं पाणी घटाघटा प्यायला मिळायचं. ही सगळी पावसाची देणगी.

तो पहाटवारा, तो पावसाळी पाऊस हे सारे त्या माणसांना देवासारखे वाटायचे. गोधन वाढवणारे हे देव म्हणून माणसं त्यांना आळवायची.

माणसांत प्रेमळ माणसं असतात तशी रागीटही असतात. मग असाच प्रकार देवांत का नसावा? अशा कल्पनेनं रागीट देवाचीही योजना केली माणसांनी. वारा सूं सूं घोंगावतोय, पाऊस कडकडाट गडगडाट करीत धुवांधार कोसळतोय, असं काही झालं की हा रागावलेला देव रुद्र थैमान घालतोय असं वाटायचं. त्याला विनवायला हवं की, 'बाबा, आमच्या चालत्याखेळत्या गाईगुरांवर दया कर.'

ते गोधन रानावनात नेऊन, चारापाणी करून संध्याकाळी संभाळून घरी आणणारे गोपाळही फार कामाचे होते. ते गायवासरांवर प्रेम करायचे, त्यांना शिस्तही लावायचे. गाईंचे राजेच जणू. माणसांचे राजे होतेच. माणसांना वाटलं, देवही पुष्कळ आहेत, त्यांचाही राजा असला पाहिजे. त्यांनी देवांच्या राजाला नाव दिलं 'इन्द्र'– गोपाळ, मेंढपाळ अशा काही अर्थाचं.

त्या इन्द्राची प्रार्थना करायची. त्याला सांगायचं, 'मला अन माझ्या घरातल्यांना तर सुखी ठेवच. माझ्या गोठ्यातल्या अन वाड्यातल्या माझ्या गाईवासरांनाही, सगळ्या देवांना संभाळतोस तसाच नीट संभाळ. त्यांच्याच धारेतून देवांना घालायचे पदार्थ होतात. तुझ्या आवडत्या सोमातही ते तुला ओळखता येतील. तेव्हा गोपाळाच्या, गुराख्याच्या रूपानं तूच त्या साऱ्यांना नीट घरी आण, गोठ्यात घाल.

त्या परत आल्या, गोठ्यात किंवा वाड्यात गेल्या, वासरांना चाटू लागल्या की आमचं सगळं कुटुंब घरवासी झालं, घर भरून गेलं. आता आभार मानायचे प्रजापतीचे. गोप्रजा, मनुप्रजा, वनप्रजा या सगळ्यांचा देव प्रजापती. त्याला आळवू आणि कळवू की या आमच्या विशाल कुटुंबात आम्ही सुखी आहोत, समाधानी आहोत, म्हणून आणखीही चार लोकांना बोलवू, त्यांच्यासंगे जेवू खावू, अग्नीला आहुती देऊ, साऱ्या देवांना आवाहन करू आणि त्या गाईंचं गोरस घालून केलेला सोम त्यांना देऊ, स्वतःही पिऊ. त्यावेळी आम्हां सर्वांसाठी काही काही मागू आणि मुक्या गाईवासरांना स्वतः काही मागता येत नाही म्हणून त्यांच्याही वतीनं आम्हीच काहीतरी मागू.

□□□

# शेताजी सीताई : कृषिसूक्त

आम्ही शेताजी देवाच्या जिवावर करू जैत ।
गाई घोडे पोसतो तो देतो आम्हाला संतोष ॥ १ ॥
शेताजी देवाजी, गोडगोड पाणी
वरसावे गाईच्या धारेवानी
मधाळ कढीव तुपावानी
आम्हा सुख द्यावे न्यायाच्या देवांनी ॥ २ ॥
झाडेपाले पाणी गोड असावेत
स्वर्ग अंतराळ गोड असो
शेताचा देवाजी आम्हा गोड असो
त्याच्या मागे आम्ही आनंदाने जातो ॥ ३ ॥
कल्याण बैलांचे तसे माणसांचे,
कल्याण करो या शेताचे नांगर
कल्याणाच्या गाठी वडींच्या असोत
कल्याणकारक असावा आसूड ॥ ४ ॥
शेताजी सीताई, आवडतां बोल
आभाळासी गेली करूनिया चाल
म्हणूनीया आता करावी शिंपण ॥ ५ ॥
आमच्या बाजूची होई सौभाग्याची,
सीतामाई तूला वंदने करीतो
जेणे तुवां व्हावे सौभाग्य देणारी,
सुफळ आमची शेती करणारी ॥ ६ ॥
इंद्रानेही घ्यावा सीतेचा पत्कर
पूषा तिला दान देवो भरपूर
दुभती ती व्हावी आमुचिया साठी
पुढुती पुढुती हर वर्षाकाठी ॥ ७ ॥
कल्याणा आमुच्या नांगरोत फाळ,
नांगऱ्ये चालोत बैलांच्या संगती
कल्याण पाऊस बरसो पाण्याने,
आम्हां सुख द्यावे, शेताजी-सीतेने ॥ ८ ॥

❑

शेतकऱ्यानं शेतात शेती केली नाही तर कुणालाच खायला मिळणार नाही. खायला मिळालं नाही तर जगणार कसे?

शेती करतात जमिनीवर. पण तिला पाणी लागतं ते येतं आकाशातून, पावसाचं. पण नुसतीच जमीन असली अन तिच्यावर पाऊस पडला तर आपोआप काही शेती होत नाही. शेतकऱ्याला त्यासाठी सतत काही ना काही करीत रहावं लागतं.

उन्हाळ्यात नांगर चालवून जमिनीत खोल तासे किंवा चारी खोदवून घ्याव्या लागतात. त्या नांगरासाठी बैल किंवा घोडे लागतात. त्या बैलांची घरातल्या माणसांसारखीच काळजी घ्यावी लागते. बैल हवेत तर गाई पाळाव्या लागतात. त्यांना चारापाणी द्यावे लागते.

मग बघायची पावसाची वाट. तो आला, भरपूर आला तरच काही तरी पेरता येईल. ते उगवून आल्यावर पुन्हा पाणी द्यायला पाहिजे. किंवा पुन्हा पाऊस यायला पाहिजे. पिकाची मशागत करायला पाहिजे... मग चार महिन्यांनी कधीतरी सुगी येते. धान्य खळ्यात मळावं लागतं. तयार झालेलं धान्य माणसांना खायला गोड लागतं. त्याची वैरण गाई-बैलांना घोड्यांना गोड लागते. त्या गाई गोड गोड दूध देतात...

शेतकरी हे सारं करीत असतो. पण प्रत्येक कामात प्रत्येक वेळी, निसर्गावर अवलंबून रहावं लागतं. पूर्वीच्या काळी तर फारच. मग शेतकरी म्हणायचा, 'शेता बाबारे, चांगलं पीक दे. पावसाच्या देवा, पाऊस आण...' आणखी बरंच काही. वेदकाळातला शेतकरी काय म्हणायचा?

शेतावर जाऊन आम्ही काम करतो हे खरं आहे. पण भरपूर पीक येणं ही काही माझ्या हातातली गोष्ट नाही. ह्या शेताचा जो देव आहे ना, त्याच्याच जिवावर आमच्या सगळ्या उड्या. आमच्या गाईबैलांना तोच वाढवतो.

गाय गोड दूध देते. शेताजी देवा, इथं पाऊस पडला तर गाईच्या दुधासारखाच तो आम्हाला गोड वाटेल. लोणकढ्या तुपात मध कालवून घेतल्यासारखं वाटेल. आम्हाला माहीत आहे की पावसाचा देव तू एकटा नाहीस. पण कडक उन्हाळ्यानंतर पाऊस हा यायचाच अशी व्यवस्था चालवणारे जे देव आहेत ना, त्यांनी ते पहावं.

त्यांच्या कृपेनं शेताच्या बांधावरची झाडंझुडपं गोड असू देत; तळ्यामळ्यातलं पाणी, ताराचांदण्यांचं अंतराळ, निळं निळं आकाश सारी आम्हाला गोड वाटू देत. शेताजी, तुझी आमची गोडी तर आहेच, तू ती कायम ठेव. अगदी आनंदानं तुझं बोट धरून, चालवीत नेशील तिकडं आम्ही येऊ.

आम्ही शेतात नांगर धरला आहे. त्या नांगराचे बैल सुखी ठेव, तो चालवणाऱ्या नांगऱ्यांना सुखी ठेव. बैलांच्या मानेवरच्या जोखडाला बांधणाऱ्या वडीची (दोराची) गाठ शुभकारी असो. नांगरणी कल्याणकारी असो. इतकंच नाही, बैलांना हाकण्यासाठी जो आसूड आम्ही चमकावतो तोही कल्याणकारी असो.

शेताजी देव आणि कल्याणी देवी दोघांना आमचं गाणं आवडलं. सरळ आकाशात गेली दोघं. छान. आता आमच्या या नांगरलेल्या शेताची शिंपण करा.

कल्याणी, सीतामाई, तू आमची देवी. आकाशात अस नाहीतर जमिनीत. आमच्यावर लक्ष असू दे, प्रसन्न हो. तुला नमन करून सांगतो आम्ही, की तू सुंदर हसऱ्या चेहऱ्यानं आमच्याकडं पहा, आमची शेती सुफळ होऊ दे.

या सीतेला, या शेतीला इंद्रदेवाची जोड मिळू दे. सगळ्याचं पोषण करणारा पूषादेव तिला खतपाणी देऊ दे. मग गाय जशी दूध देत राहते तशी ही शेती आम्हाला वर्षानुवर्षे अन्नपाणी देत राहो !

फिरून फिरून सांगतो : आमच्या नांगरांचे फाळ जी नांगरट करतील ती कल्याणकारी होवो. बैलांच्या बरोबरचं नांगऱ्याचं चालणं सुखदायक होवो. पाऊस गोड पाण्याच्या धारा घेऊन येवो. आणि या साऱ्यांचे कारण असलेले शेताजी आणि सीताई आम्हाला सुखाचा, आनंदाचा लाभ करून देवोत !

❑❑❑

## जलदेवता

येतायत आया हितकरी माया
अमुच्या यज्ञाला या दुधा गोडी द्याया ॥ १ ॥

देवी सूर्यापाशी सूर्य ज्यांच्यापाशी
येऊन शोभवा आमुच्या यज्ञासी ॥ २ ॥

गाई ज्यांचे पाणी पितात, त्या देवी
बोलवतो धारांनी द्याया त्यांना हवी ॥ ३ ॥

पाण्यात अमृत पाण्यात औषधी
पाण्याच्या आरती देवही करोती ॥ ४ ॥

पाण्यामध्ये सोम औषधेही सारी
अग्नी जो कल्याणी. पाणी गुणकारी ॥ ५ ॥

पाण्यांनो शरीरा पुरवा रोगहारी
सूर्य तो चिरकाळ दिसो डोळ्यांदारी ॥ ६ ॥

पाण्यांनो वाहा, न्या पाप अजाणते
वावगे वर्तन वा बोललो जे खोटे ॥ ७ ॥

पाण्यांत ठाकलो रसांनी माखलो
जलवासी अग्नी मज भरभरून देवो तेज ॥ ८ ॥

❑

**उन्हाळा** आला आहे. आपल्या देशात तो चांगला कडकडीत असतो. पाणीपाणी होऊन जातं सगळ्यांना. मोठ्या शहरांत, लहान गावांत सगळ्यांना सारखीच पाण्याची ओढ लागते आणि तहानेवर पाणी गोड लागते.

शहरात पाणी लागतं माणसांनाच; खेड्यापाड्यात ते हवं असतं माणसांना, गाईबैलांना, शेळ्यामेंढ्यांना आणि लहानमोठ्या पिकांना. शहरात बरेवाईट नळ असतात पाणी पुरवायला. खेड्यांत ते विहिरीचं, डोहाचं, ओढ्याचं किंवा नदीचं आणावं लागतं.

पूर्वी आजच्यासारखी शहरं नव्हती आणि खेडीसुद्धा लहान होती. त्या काळात पाण्यासाठी खूपच त्रास घ्यावा लागायचा –अन् म्हणून त्याचं मोल कळायचं. तहानेवर पाणी प्यालं की शक्तीचं औषध घेतल्यासारखं वाटायचं; पिकांना पाणी मिळालं की ती तजेलदार हिरवीगार व्हायची; धान्यधुन्य भाजीपाला भरपूर पिकायची, गाई खूप दूध द्यायच्या. अशी सारी चंगळ व्हायची.

लोकांना पाण्याचं फार कौतुक वाटायला लागलं. माणसापुरतं पाहिलं तर अन्नापेक्षा पाणी मोठं होतं. अन् पाणी पातळ असतं, आईच्या दुधासारखं. आईचं दूध माणसाला जन्मल्यापासूनच माहीत असतं, अन्नापेक्षा मोठं असतं. म्हणून माणसांना पाणी जवळजवळ आईच्या दुधासारखं वाटायला लागलं. अरे! म्हणजे पाणी हे सुद्धा कोणत्या तरी आयांचं दूध असावं. त्या आपल्याला दिसत नाहीत. म्हणून काय झालं, पाण्यात खोल कुठं तरी लपलेल्या असतील माऊल्या!

आईच्या दुधासारखंच गाईम्हशीचं दूध. त्या जे पाणी पितात त्याचंच दूध होत असलं पाहिजे. पण पाण्यात नसते ती गोडी दुधात असते. गाईम्हशीला काय साखर घालता येते का पाण्यात? हे काम नक्की त्या पाण्यातल्या आयांचंच –असं त्या माणसांना वाटलं.

हळूहळू माणसांच्या लक्षात आलं : नदीतलं, विहिरीतलं पाणी आटून जातं आणि पावसाळ्यात पुन्हा येतं. पाऊस आकाशातून येतो. मग पाण्यातल्या त्या आया आकाशात कुठं तरी असाव्यात. सूर्य पाणी आटवून घेऊन जातो. म्हणजे त्या माऊल्या आकाशात सूर्याजवळ कुठे असाव्यात. पाऊस सुरू व्हायच्या वेळेला सूर्य कुठेशी उगवतो ते त्यांनी पाहिलं. त्याच्या जवळपास सहासात चांदण्यांचा मेळावा त्यांना दिसला. ते म्हणाले, 'हां. पाण्यात दिसत नव्हत्या ना, त्या मावलाया ह्या इथं आकाशात चमचम करतायेत.'

पण आकाशात देवदेवता राहतात म्हणे. चांदण्यांचं रूप घेऊन झळकत असतात. म्हणजे याच त्या पाण्यातल्या आया, आकाशातल्या देवता. सूर्यानं ओढून घेतलेलं पाणी याच स्वत:जवळ ठेवतात अन् पावसाच्या धारांनी पृथ्वीवरच्या माणसांकडं शिंपडतात. याच जलदेवता या पाण्याचं अन्नधान्य बनवून देतात, औषधी झाडपाले वाढवतात. त्या जर असं आणि इतकं माणसांसाठी करतात तर आपणही त्यांना प्रसन्न ठेवलं पाहिजे. म्हणून आपण त्यांना चांगले म्हणून त्यांचे आभार मानू; त्यांची प्रार्थना करू की आम्हाला असंच आणखी आणखी द्या. पाणी द्या, औषधे द्या, शक्ती द्या, तेज द्या.

मग माणसांना वाटलं : या आयांना, देवींना आपण काही मागायचं तर त्यांना काही द्यायला नको का? देऊ या. आपण एकत्र येतो, मेजवान्या करतो, नाचतो गातो, गोष्टी सांगतो, तेव्हा देवांना-देवींना त्या खाण्यातला पिण्यातला काही भाग देऊ या. तो वर त्यांना पोचायला हवा. म्हणून धूर, जाळ होणाऱ्या आगीत टाकू या. आगीत टाकायचं त्याला म्हणू 'हवी' आणि या सगळ्या उत्सवाला म्हणू : यज्ञ! यज्ञात हवी टाकून देवांना पोचेलच. पण देवांनाच 'इकडे या' असं म्हणून तर पाहू या. असं वाटून त्या माणसांनी देवांना अशी विनंती करायच्या प्रार्थनाच बनवल्या. प्रार्थनेत आपण जे बोलू तसं होईल इतकी शक्ती वाटली तर तिला 'मंत्र' म्हणायचे. त्यांचा विश्वास होता की देवांना बोलावण्याचे मंत्र नीट तालसुरावर म्हटले की देव यज्ञाला येतातच.

असल्या चाली जगातल्या सगळ्याच माणसांमध्ये या ना त्या रूपानं चालूच होत्या आणि आहेत. अजूनही आपल्याकडं लग्नाची पहिली पत्रिका कुलदैवताला देतात. आणि पुष्कळ ठिकाणी लग्नानंतर 'गोंधळ' नावाचा पूजापाठ करतात. तो गोंधळी सुरुवातीलाच 'जेजुरीच्या खंडोबा गोंधळाला यावं' यासारखी आवतणी म्हणजे बोलावणी सगळीकडच्या देवांना करीत असतो.

तेव्हा यज्ञात म्हणायचे मंत्र, सूक्ते (चांगली वचनं) या गोष्टी पाच हजार वर्षांच्या जुन्या असल्या तरी अनोळखी नाहीत. असे हजारो मंत्र वेदात एकत्र केलेले आहेत. ते संस्कृत भाषेत असल्याने हल्ली फार लोकांना समजत नाहीत. तरी पाण्याच्या देवतांना बोलावण्यासाठी म्हणायचे काही मंत्र मराठीतून दिलेत ते आपल्याला कळतील. गोंधळ खेड्यापाड्यातच चालतात आणि वेदांतले मंत्र रचणारे तसे खेड्यांतलेच होते म्हणून हे मंत्रही थोड्याबहुत खेडवळ बोलीत दिले आहेत. वेदातल्या जलदेवतांची ही ओझरती ओळख.

□□□

# पावसाच्या देवा : पर्जन्यसूक्त

पावसाच्या थोर देवा मंत्र गावे  नमन करावे आणि सेवाभावे
बैल डरकत यावा तसा येतो  पाण्याने औषधी बीजे वाढवीतो ॥ १ ॥

झाडे झोडपतो, राक्षस मारतो  हाणामारीने या जगा भिवविती
साधे भोळे जन चाहती पाऊस  जो का दणादण ठोकतो दुष्टांस ॥ २ ॥

घोडे आसुडाने सारथी दौडवी  तसा हा ढगांनी पाऊस पाडवी
दूरदूर सिंहासारखा गर्जतो  पावसाचा देव आकाशा ढाळितो ॥ ३ ॥

तुला नमण्यास पृथ्वी खाली आली  तुष्ट प्राणिमात्र येरझारा घाली
नमना औषधी उभ्या ठायी ठायी  पावसाच्या देवा हो कल्याणदायी ॥ ४ ॥

सुसाटती वारे विजा कडाडती  झरता हे आकाश औषधी वाढती
भूमी सारे जग पोसाया समर्था  पावसाचा देव पाणी तिला देता ॥ ५ ॥

वाऱ्यांनो स्वर्गीचा पाऊस आम्हा द्या  घोड्यांच्या अंगच्या धारांना झरू द्या
देवा गर्जणारा ढग संगे आण  बळवंत बापा ये करीत शिंपण ॥ ६ ॥

गडगडा गर्जना करीत तू यावे  पाण्याने भरल्या रथाने फिरावे
पखालीचे तोंड मोकळे करावे  उंच खोल जग सपाट भरावे ॥ ७ ॥

ढगातली ठेव वरतून बरसू दे  मोकाट धारांना सुसाट वाहू दे
आकाशा पृथ्वीला चिंब तू होऊ दे  पोटभर पाणी गाईंना पिऊ दे ॥ ८ ॥

पावसाच्या देवा वाजत गाजत  येतोस वाईट लोकांना मारीत
त्याने सर्व जीव होती आनंदित  पृथ्वीवर जे जे आहेत राहत ॥ ९ ॥

धो धो धो आलास ओढून घे धारा  कोरड्या देशांना जाई तू पुढारा
खाण्यापिण्या झाले मोप अन्नपाणी  वाहिली तुला ही आभाराची गाणी ॥ १०

दिवस जात असतात, सारखे बदलत असतात. आधी कोमट असतात, मग तापट, मग कडक. पाणी हवंहवंसं असतं, मग ते थोडं का असेना. म्हणून पाण्याच्या देवतांकडं मागणी करायची. थोड्याशा पाण्याची.

आणखी दिवस जातात. उन्हाचा चटका थोडा कमी वाटतोय. आकाशात एखादा ढग दिसतोय वाटतं. ठीक. आता पाऊस येणार. दरसाल येतोच. म्हणून आता पाणी हवं असं नाही म्हणायचं, पाऊस हवाय म्हणायचं. एवढंसं नाही मागायचं, भरपूर मागायचं.

पाण्याच्या देवतांपेक्षा पावसाच्या देवाला सांगायचं, बोलवायचं. तो कुठं असतो? अर्थात आकाशात. कारण पाऊस आकाशातून येतो ना! अन पाऊस येतो तेव्हा आकाशातलं कुठं काय दिसत असतं ? म्हणजे पावसाचा देव दिसणार नाही, पाऊस मात्र दिसत राहील. पावसाचा देव पावसाला आपल्याकडे पाठवील.

त्याला गाणी गा. त्याचं बळ फार मोठं आहे. त्याची स्तुती करा. त्याला चहूकडे नमस्कार करा. मग तो बैलांच्या डरकाळीसारखा मोठा आवाज करीत येईल. झाडांवेलींच्या आत शिरेल.

आपल्याला माहीत आहे, पाऊस नुसता येत नाही. जोरात येतो. तो मोठाली झाडंसुद्धा झोडपतो. आपल्या पूर्वजांची समजूत होती की मोठ्यामोठ्या झाडांमध्ये मोठे मोठे राक्षस राहतात. पाऊस जो एवढ्या जोरानं गरजत येतो तो त्या वाईट राक्षसांना मारायला. म्हणून आधी आपल्याला त्या गरजण्याची भीती वाटली तरी बिघडत नाही. आपण काही वाईट केलेलं नाही, तेव्हा आपल्याला पावसाचा लाभच तेवढा मिळणार. 'पावसाच्या देवा, आमचं कल्याणच कर'.

पावसाचा देव दिसत नाही, ढगांचा गडगडाट मात्र ऐकू येतो. जमिनीवर नाही का, रथ दिसत नसला तरी त्याचा खुडखुडाट ऐकू येतो. रथांचा सारथी घोड्यांना चाबकाचे फटके मारून दौडवीत असतो. तसाच हा पावसाचा देव ढगांना फटकारीत असावा, 'चला व्हा पुढे' म्हणत.

नुसते ढगच नाहीत. सोसाट्याचा वारा वाहतोय. विजा कडाडताहेत. सारं आकाश पाझरतंय, पाऊस धरणीवर बरसतोय, धरणीच्या आत मुरतोय. आता ती भूमी जगाचं पालन करायला तयार होतेय.

ती पावसाच्या देवाला वंदन करतेय. तिच्यावर चरणारे फिरणारे प्राणी आनंदात आहेत. सगळीकडं वनराई झाली आहे. ही कल्पना करूनच ती माणसं म्हणतात,

'पावसाच्या देवा, भरपूर कल्याण कर आमचं! वाऱ्यांनो, आकाशातून धारा बरसू द्या. घोडे खिंकाळतात तसे गडगडणाऱ्या ढगांना पाणी शिंपायला लावा.'

किंवा त्यांना वाटे, आपण नदीवरून पखालीत पाणी भरून आणतो, तसा हा पावसाचा देव रथावर पखाल घेऊन आला आहे. आता पखालीचं तोंड मोकळं केलं की पाऊस कोसळणार अन् मग खोलगट, उंच, सारं पाण्यानं सपाट होऊन जाणार.

पखाल नाही, पाण्याचा खजिनाच भरून आणलाय त्यानं. 'पावसाच्या देवा, कर तो खजिना रिकामा. वाहू देत नदीनाले तुडुंब भरून. भिजू देत आकाश आणि पृथ्वी, ओली चिंब. पिऊ देत आमच्या गाईंना भरपूर पाणी.'

'आम्ही वाईटसाईट काही करीत नाही. तुझ्या गरजण्याने वाईट वागणारांनाच तू धाक लावतोस हे आम्हाला माहीत आहे. आणि या सगळ्या जगाला त्याचा आनंद आहे.'

पावसाळाभर पाऊस येतो. पावसाचा देव त्यांच्यावर प्रसन्न आहे. त्याची गाणी गाणारे आता तृप्त झाले आहेत. आपण प्रार्थना केल्या म्हणूनच एवढा पाऊस आला असा त्यांचा विश्वास आहे. आता आपल्याला तो पुरे झाला. आपण हाव करू नये. आपल्या खाण्यापिण्याची सोय त्यानं केली, आनंद आहे. आता त्यानं त्या पावसाच्या धारा ओढून घ्याव्या, आणि पुढं जावं. आपण मागे कोरडे होतो तसे आणखीही कोरडे देश आहेत. त्यांच्यावर त्या बरसाव्या.

आपले पूर्वज जलदेवतांची प्रार्थना करीत, पर्जन्याची म्हणजे पावसाच्या देवाचीही करीत. पाऊस यावा म्हणून यज्ञही करीत. त्यात पावसाच्या देवाला संस्कृत मंत्र म्हणत. आपण नाही का म्हणत 'येरे येरे पावसा!' अन् वर त्याला सांगतो ' तुला देतो पैसा!' तसाच होता तो प्रकार. शिवाय गाण्यांमध्ये त्याच्या गडगडाटाची वर्णनं. त्यांच्या आजूबाजूला बैलांच्या डरकाळ्या, घोड्यांच्या खिंकाळ्या ऐकू यायच्या. ढगांचा आवाज त्यांना देवाच्या घोड्यांचा किंवा रथाचा वाटायचा. ते सगळं त्या मंत्रांमध्ये आलंय. या दहा मंत्रांच्या गाण्याला नाव आहे : 'पर्जन्यसूक्त'.

## बेडकांची प्रार्थना : मण्डूकसूक्त

वर्षभर समाधीत जणू ब्राह्मण हे व्रती
पावसाची आवडती गाणी बेडूक गाताती ॥ १ ॥

आकाशीच्या धारा सुक्या मोटांवरी
डबक्यात डुंबती बेडूक-दर्दुरी ॥
गाईवासरांची हंबरणी जशी
बेडूकमेळ्यांची मेळगाणी तशी ॥ २ ॥

तहान-लालस मंडूकमंडळी
टुम्म चिंब झाली झड पावसाळी
ओळखी विळखी बाळ बापा जसे
सूर लावणारे विलगले तसे ॥ ३ ॥

पाऊस ढाळता बेडूक धुंदले
एकाने एकाला मागून वेढले
भिजले गुजले तरले बुडाले
ठिपकाळे लिंबाळे, सुरीं सूर मेळे ॥ ४ ॥

गुरूचा जो सूर तो चेला लावीतो
  तसाच एकाची एक री ओढीतो
उदंड सुकाळ बेडकां लाभला
  म्हणून पाण्यात चालला गल्बला ॥ ५ ॥

खोंडसुरे कोणी मेंढसुरे कोणी
  ठिपकेवाले आणि लिंबूरंगी कोणी
नाव एक दिले रूप वेगळाले
  बहुतां ठिकाणीं गाते आढळले ॥ ६ ॥

सोमयाजी भट रात्री मंत्रपाठ
  तळे कसे सारे आलापीने भरे
वर्षाचा दिवस ज्यात ये पाऊस
  त्यात बेडकांनो तुमचा सर्ववास ॥ ७ ॥

सोमण ब्राह्मण बोलतात बोल
  वर्षभरे व्रत पाळुनी कठोर
घामेजले जणू दुधाळे धरून
  प्रकटती आता नाहीत दडून ॥ ८ ॥

देवधर्मकाज जोपीत राहती
  बाराही मासांचे नेम पाळताती
आधी उन्हाळ्यात शुष्क पोळलेले
  येता पावसाळा मुक्त मोकळले ॥ ९ ॥

आम्हां मेंढसुरे खोंडसुरे देवोत्
  धन ठिपकेवाले लिंबूरंगी देवोत्
गाईही शेकडो मंडूकहो द्याहो
  वंश तुमचाही सहस्रधा वाढो ॥ १० ॥

❑

कडक उन्हाळ्यानंतर पहिला जोरदार पाऊस झाला की रात्री टिकलीएवढी तळी जमतात. अन् ती तळी गायला लागतात. तळी गातात म्हणायचं, कारण वेगवेगळे एकसुरी आवाज तर येतात, पण ते सूर काढणारे तर रात्री दिसत नसतात. मग दिवसाउजेडी बघितलं तर त्या तळ्यांमधले गाणारे गळे पाण्यावर दिसतात. तळ्यांना आपण म्हणतो डबकी, अन् पाण्यावरच्या तरणाऱ्यांना म्हणतो बेडूक-बेडकी.

पावसाच्या आधी होती कुठं ही मंडळी? दिसेनाशी, कुठंकुठं लपून बसली होती. त्यांना आवडते ओलसर हवा, तसाच त्यांना पाऊस हवा. उन्हाळा तर मुळीच नको. त्यामुळे त्यातले कुणी झाडांमध्ये, कुणी जमिनीत बिळांमध्ये, स्वस्थ बसलेले असतात. काही खातपीत नाहीत. त्यामुळे सुकून कडक झालेल्या कातड्याच्या मोटेसारखे. पाऊस पडला की त्यांच्यात जीव येतो, त्यांना जाग येते, आणि एकदम कंठ फुटतो. सगळे बेडूकराव करतात गावगाव, आपण म्हणतो डराव डराव. पण ती नसते डरवण्यासाठी. ती गावगाव असते बोलावण्यासाठी. बेडूकराव बेडूकबाईंना म्हणत असतात, 'आव आव'.

माणसांना ते सगळे बेडूकच. अन् माहीत काय, गाताएत कोण अन् येताएत कोण. कळतं इतकंच की वर्षातून एकदाच हा उत्सव होतो. शाळेतल्या मुलांना वाटेल हे पाढे म्हणताहेत, वारकऱ्यांना वाटेल भजन करताएत, भटजींना वाटेल मंत्र म्हणताहेत. फार पूर्वी आपल्याकडे मंत्र म्हणणारे ब्राह्मण असायचे. कोणी कोणी लोक यज्ञ करायचे. त्यात देवांच्या प्रार्थनेचे मंत्र हे ब्राह्मण म्हणायचे. ते सगळे यज्ञाच्या आधी व्रत करायचे. व्रत म्हणजे उपास, डोळे मिटून देवाचं ध्यान, पहाटे उठून स्नान... वगैरे. सोमयाग या यज्ञाची तयारी वर्षभर चालायची. पावसाळ्याच्या सुमारास संपणाऱ्या या यज्ञात वेगवेगळे ब्राह्मण आपापल्या आवाजात मंत्रपाठ करायचे.

मंत्रपाठ संस्कृत भाषेत. त्या भाषेत बेडकाला म्हणतात मंडूक, म्हणजे पाय मुडपणारा. नाहीतर दर्दुर, म्हणजे दरावदराव करणारा. तर त्या ब्राह्मणांना वाटले की हे बेडूक म्हणजे जणू वर्षभर व्रत करून पावसात मंत्रपाठ करणारे मंडूक मुनीच!

आणि वेगवेगळे! कुणाचा पाठ गायवासरांच्या हंबरण्याचा, कुणाचा शेळीमेंढीच्या बे बे सारखा. कोणी लिंबूरंगाचे तर कोणी ठिपक्या अंगाचे. अन् दिवसा बघावं तर छोटी छोटी तळी यांनी भरलेली. पाण्यावर पोहताएत, काठावरून पाण्यात उड्या मारताएत. पाय मुडपलेले, अंगावर पाणी तकाकतंय, आणि सगळ्यात गंमत म्हणजे एकटेएकटे नाहीत. एक दुसऱ्याच्या पाठीवर, नाहीतर कमरेशी. पाठीवर कसे?

वरच्याचे हात खालच्याच्या काखांमध्ये गुंतवलेले. कमरेशी कसे, तर मूल गर्दीतसुद्धा वडलांना ओळखून त्यांच्या कमरेला हातांचा विळखा घालून चालतं तसे! आणि मागे पाण्यावर, कधीकधी दुधावरच्या फेसासारखा पांढरा तवंग.

मंत्रपाठी ब्राह्मणांना वाटले : रात्री हे बेडूकभटजी, हे मंडूकमुनी पावसाचे मंत्र म्हणत होते, कारण पाऊस आल्यामुळं खूष झाले होते. वर्षभर दिसत नव्हते, आतामात्र लपलेले नाहीत. खूपखूप आहेत, आणखी खूप होतील. काय भरभराट! आपणही पावसाची प्रार्थना करतो; गाईघोडे मुलंबाळं हवीत, वाढावीत, सुखात रहावीत असं मागतो. या मंडूकांनी मागितलं, पावसानं त्यांना दिलं. आपण पावसाला तर मागूच पण या मंडूकमुनींनाही मागू या.

म्हणून त्यांनी मंत्र रचले. त्यांना मंडूकसूक्त म्हणतात. मंडूकसूक्त म्हणजे बेडकांची प्रार्थना. बेडूक पावसाची करतात. माणसं बेडकाची करतात. पूर्वी वेदपाठी ब्राह्मणांनी संस्कृतमध्ये केली तशीच आपण मराठीत करू. 'काय हा भोळेपणा' असं नका म्हणू. उन्हाळ्यात वाळून सुक्या मोटा झालेली ही मंडळी पावसाळ्यात फुगतात अन् उड्या मारीत आपली सेवासुद्धा करतात. कशी? ती स्वत: किडेबिडे खाऊन राहतात हीच त्यांची सेवा. कारण, त्यांनी हे किडे गट्टम केले नाहीत तर ते किडेबिडे शेतातल्या पिकांची घाण करतात. बेडूकमुनींचं हे चांगलं काम आपल्याला दिसत नाही, ते लक्षात घेऊ. पावसाळी रात्री तेही दिसत नाहीत पण सुरावर गातात. त्यांच्या सुरात आपलाही सूर मिळवू.

❑❑❑

# नदीसूक्त

तुमचा नद्यांनो महिमा विशाल
गातो कवी यज्ञशाळेमधी मी
ज्या सात सातीं झरतां त्रिलोकी
त्यामाजि सिंधू स्वबळेच नामी ॥ १ ॥

सिंधू तुला वाट वरुणेंच केली
तीनें तुझी धाव समृद्ध देशीं
भूमीतले झाकित टेक जाशी
सगळ्याजणींच्या पुढती रहाशी ॥ २ ॥

आवाज भूमीहुन जाई स्वर्गा
वेगास दावी उसळीत लाटा
मेघांतुनी पाउस का धडाडे
डरके वळू का, तशी सिंधु वाहे ॥ ३ ॥

वत्साकडे धावत गाय माय
सिंधू, नद्या तेवि तुझ्याकडेस
राजा लढाऊ तशी अग्रभागी
त्यांच्या, भरूनी तट वाहतेस ॥ ४ ॥

गंगे तुवां अन् यमुने सरस्वती
परुष्णी शुतुद्री स्तव आयकावे
असिक्नी मरुद्वृध् अन आर्जिकीये
वितस्ते सुषोमे तुम्ही कान द्यावे ॥ ५ ॥

पहिली तृष्टामा दुसरी सुसर्ती
श्वेती रसा, सर्व सख्या प्रवासी
कुभा गोमती मेहतनी क्रुमूंच्या-
प्रमाणेच सिंधू रथस्वार होसी ॥ ६ ॥

रेखेत वाहे दिपवीत श्वेता
वेगाळ घेऊन पखालपाणी
नद्यांची नदीमाय सिंधू दयाळू
स्त्री देखणी का तुरगा सुलक्षणी ॥ ७ ॥

सिंधूस घोडे रथ छानदार
वस्त्रे सुवर्णे, धनधान्य थोर
पाडे, मळे, नांगर जुंपलेले;
भरली सदाची, तटिं झाडपाले ॥ ८ ॥

घोडे रथा जोडुन सिंधु येवो
उदंड अन्ने यजनास देवो
महान गावा महिमा रथाचा
यशस्वी स्वतः ख्याति पावे तयाचा ॥ ९ ॥

❑

अगदी लहानपणापासून आपल्याला कळायला लागतं की काही गोष्टी हालचाल करतात तर काही एकाच जागी कायम असतात. हालचाल करणारी सगळ्यात पहिली आई, मग इतर माणसं, मग लहानमोठे प्राणी. एकाच जागी कायम असतात वेगवेगळ्या वस्तू, घर, भिंती, दगडमाती, जमीन वगैरे. पुढं मग आपण हालचाल करणाऱ्यांना म्हणतो 'सजीव'. माणसं सजीव असतात. त्यांचं बोलणं, चालणं, हसणं, रागावणं, आवाज करणं, धावणं, कावणं आपल्याला चांगलं समजायला लागतं. मग दुसऱ्या कोणत्याही सजीव गोष्टीची आपण माणसाशी तुलना करतो. तिनं आवाज केला तर आपल्याला वाटतं ती बोलतेय. तो आवाज लयीत असला तर आपण म्हणतो, ती गातेय. आवाज कर्कश आला तर वाटतं ती रागावतेय.

आपण सारखे जमिनीवर असतो आणि जमीन तर अगदी स्थिर वाटते. कुठं तरी पाणी साचलेलं दिसतं तेही स्थिरच असतं. जिथं ते वाहतं तिथं मात्र पाणी सजीव असल्यासारखं वाटतं. झरा, धार, ओघळ, ओहळ, ओढा, नदी... अशा अनेक रूपांत आपल्याला पाणी सजीव वाटतं.

नदीत पाणी खूप असतं अन पूर आलेला असतो तेव्हा तरी एकाच धारेनं ते वाहत असतं. पण ही धारा उगमापासून मुखापर्यंत एकटीच नसते. तिला मधूनमधून दुसऱ्या धारा येऊन मिळत असतात. सिंधू या नावाच्या मोठ्या नदीला महत्त्वाच्या अशा सात वेगळ्या धारा किंवा नद्या येऊन मिळाल्याचं दिसतं. या सातही नद्यांना प्रत्येकी सात ओहळ मिळाले असतील. ते डोंगरांतून, सपाटीवर अन शेवटी सिंधूच्या खोल दरीत असे तीन प्रकारांनी वाहतात. या साऱ्या सात-सात ओहळांहून सिंधू नदी मोठी असणारच!

केव्हापासून ही सिंधू तिच्या रुंद पात्रातून वहातच आली आहे! पाण्याचा देव जो वरुण त्यानंच ह्या पात्राचा रस्ता तिला कोरून दिला वाटते! म्हणून तर उंचउंच डोंगरांमधून या साऱ्या ओघांच्या पुढं धावतेय ती. सपाटीला तिच्या काठावर शेतीभाती आहे. तिथल्या त्या अन्नासाठी तर तिची धावपळ नाही ना!

कशी धावतेय! लाटा उसळताहेत, चमकताहेत. धो धो चा आवाज होतोय. तो पृथ्वीवरून स्वर्गापर्यंत पोचतोय. धिप्पाड बैल कोणी डरकाळ्या फोडीत जात असावा, किंवा ढगांच्या गडगडाटात आभाळातून पाऊस बरसावा तसं वाटतंय.

पुन्हा त्या उपनद्या आठवतात. त्याही धावत आल्या होत्या. तान्ह्या बाळाला पाजायला आई धावते, किंवा पान्हावलेल्या गाई वासराकडे धावतात तशा त्या वेगानं

सुसाटत असतात. त्या सगळ्यांना घेऊन त्यांच्या पुढं चाललेली सिंधू. लढाईला निघालेल्या राजासारखी दोन्ही काठांच्या मधून डौलानं चालली आहे! आधी तिची सखी होती तृष्टामा, मग सुसर्तु, रसा, श्वेती, कुभा, गोमती, क्रुमु, मेहत्नु... या साऱ्यांना एकाच रथात घालून निघालीये!

सिंधू, मी या यज्ञात देवांची गाणी गाणारा, तुझे स्तवन करतो. अन तुझ्या नावानं इतरही नद्यांचं स्तवन करतो. हे स्तवन त्यांनीही ऐकावं, गोड करून घ्यावं. हे गंगे, यमुने, सरस्वती, शुतुद्री, परुष्णी, असिक्नी, मरुद्वृधे, वितस्ते, आर्जीकीये, सुषोमे... साऱ्याजणी हे कवन ऐका. तिला म्हणतो ते तुम्हालाही लागू आहे.

काही झालं तरी सिंधू म्हणजे नद्यांमधली नदीबाई! थेट वाटेनं सळसळते. पाणी भरभरून भरल्या अंगानंसुद्धा भराभरा चालते. डोळ्यात भरणाऱ्या घोडीसारखी, देखण्या दणकट तरुणीसारखी.

ज्या देशातून ही सिंधू वाहते त्याची तर भरभराट होतच असते. वेदकाळातली भरभराट म्हणजे लोकांना भरपूर खायला प्यायला ल्यायला, यायलाजायला, कामाधामाला औषधपाण्याला असावं. ते सगळं सिंधूच्या पाण्यावरल्या शेतीतून मिळालं तर तीच नदीमाय सगळ्यांची. म्हणून सगळ्यांची श्रीमंती ती तिचीच. अशा भावनेनं कवी तिला सुरथा, सुवासा वगैरे म्हणतो. आणि ती अन्नपूर्णा, ती शेतमळ्यांची मालकीण....

तिला यज्ञाला बोलवावं. ती छानदार रथातून यावी. तिच्या शेतमळ्यांत उदंड पिकलं. ते तिनं रथ भरून आणावं. त्यातून लोकांना वाटावं. रथ मोठा दानदयाळू. सिंधूचं महिमान सांगितलं तसंच या रथाचंही गाजावं. अन कवीनं सिंधूच्या स्तवनाचं हे कवन म्हणावं.

❑❑❑

# प्रार्थना वाटदेवाची : पूषा

पूषा, मिळून वाटेने ने निर्विघ्न विमोचका
देवा चाल अम्हांपुढे ॥ १ ॥
पूषा, जो लांडगा दुष्ट स्वाष्ट आम्हां सतावतो
वाटेतून पिटाळ तो ॥ २ ॥
उचली वाटमाऱ्यास कपटी पुंड चोरट्या
पार दूर हकाल त्या ॥ ३ ॥
दुराचारी करी चोरी देखता, पाठ फीरता
पायाने तुडवी खटा ॥ ४ ॥
जाणत्या देखण्या पूषा राखणीस हवास तू
होतास वडिलां जसा ॥ ५ ॥
आम्हाला सर्वसंपन्न सोनेरी शस्त्र धारका
संपत्ती दानबुद्धि दे ॥ ६ ॥
शत्रू ने आडवाटेला अम्हा सोपा सुपंथ दे
पूषा कर्तव्य मान हे ॥ ७ ॥
राई-मळ्यांतुनी नेई वाटेने त्रासही नसो
पूषा कर्तव्य मान हे ॥ ८ ॥
शक्ती दे संपदा तेज सारे पोट भरून दे
पूषा कर्तव्य मान हे ॥ ९ ॥
पूषाला बोल ना लावू सूक्तांनी आळवू सदा
मागुनी घेउ संपदा ॥ १० ॥

❑

**आजकाल** आपण प्रवासाला सहज निघतो. पुष्कळदा, अगदी ठरवून, मजा म्हणून. एकटे एकटेसुद्धा. फारच जवळ जायचं झालं तरच पायी जातो पण मग त्याला प्रवास म्हणत नाही. एरवी प्रवास होतो वाहनातून. वाहनं जातात निहार रस्त्यावरून. रस्त्यानं कुणी त्रास द्यायला येत नाही मुद्दाम. माणसं आपल्या कामाला आपल्या वाटेनं चाललेली असतात. जनावरं असलीच तर पाळीव. जंगली जनावरांची काही भीती नसते.

कोणी म्हणेल, बातम्या तर सारख्या येत असतात –रस्ता खराब आहे, वाहनाला अपघात झाला, कुणा चोरट्यांनी बस लुटली, कुणाला पळवून नेलं, एक ना एक. खरं आहे. पण ते अपवाद असतात. लाखो माणसं प्रवास करीत असतात. त्यातल्या चारचौघांवर असा प्रसंग गुदरतो. सर्वसामान्य माणूस सुखरूप जातो येतो. विशेष काळजी करणाऱ्या माणसाला प्रवासाचा विमा उतरवण्याची पण सोय आहे. झालाच अपघात किंवा चोरी, तर भरपाई मिळते.

पूर्वी स्थिती खूप वेगळी होती. दीडशे वर्षांपूर्वीही पायी, घोड्यावर किंवा बैलगाडीतून प्रवास करायला लागायचा. वाटा किंवा रस्ते यथातथाच असायचे. बरेच डोंगरातून, जंगलातून जायचे. रात्री भलत्या जागी मुक्काम करायला लागायचा. जंगली जनावरांची आणि चोरचिलटांची धास्ती असायची. माणसं जीव मुठीत धरून प्रवास करायची. साधारणतः एकटी जायची नाहीत, सोबतीनं जायची. व्यापारासाठीही प्रवास करावा लागायचा. व्यापारी आपला माल, बैल खेचरे उंट अशा प्राण्यांवर लादून न्यायचे. त्यांचे तांडेच जायचे. त्यांच्या रात्री थांबण्याच्या जागा ठरलेल्या असत. आपल्या महाराष्ट्रातली प्रसिद्ध लेणी अशा थांबण्याच्या जागांजवळच कोरलेली आहेत.

वेदकाळात आणखीच कठीण परिस्थिती होती. वाटा आणि रस्ते जेमतेम. गावं लहान-लहान अन दूरदूर. रानावनातून जावंच लागायचं. मुख्य म्हणजे उपजीविकेसाठी माणसं गायींची खिल्लारं किंवा शेळ्यामेंढ्यांचे कळप पाळून रहात. अन या कळपांना, जिकडं चारा असेल तिकडं घेऊन जावं लागायचं. माणसं घोळक्यानं जायची. त्यांच्यावर चोरांचा किंवा जंगली प्राण्यांचा हल्ला झाला तर ती स्वतः प्रतिकार तरी करू शकत. ती मुकी पाळीव जनावरं काय करू शकणार? त्यांना घेऊन जाणारी माणसंही किती पुरी पडणार !

तेव्हा आपलाच धीर वाढवण्यासाठी ती गाणी म्हणायची, त्यांत देवाची प्रार्थना करायची. सध्याही डोंगरात भटकंती करायला जाणारे गट कसे गाणी म्हणून शीण घालवीत असतात किंवा अंधारातून चालताना मोठ्यानं बोलून एकमेकांना पाठबळ देतात.

वेदकाळातल्या लोकांनी यासाठी पूषन् किंवा पूषा या देवाला वाटदेव केला. मुलं लेकरं, गायीगुरं, शेरडंकरडं, बकरीकोकरी या सगळ्यांना घेऊन कुठून कुठून जायचं. त्या प्रवासासाठी वाटदेव पूषा याला साकडं घालायचं, त्याची प्रार्थना करायची. आम्हाला सोबत कर, सगळ्यांना संगतीनं ने, त्यांची ताटातूट करू नको. मेंढ्यांचा कळप घेऊन जाणारा धनगर कळपाच्या पुढं चालतो. म्हणजे वाटेत काही अडथळा अडचण असली तरी आधीच त्याला काही करता येतं. तसा तू पूषा आमच्या पुढे चाल. आमच्या कळपांवर धाड घालायला लांडगे टपून बसलेले असतात, त्यांना पिटाळून लाव.

वाटेने वाटमारे येतात. माणूस खरे, पण चोरटे, कपटी, गुंड असतात. वाटदेवा पूषा, त्यांना लांब हाकलून लाव. वाटमारे माणसांवर अन कळपांवर हल्ले करतात. कोणी भुरटे चोरही असतात. डोळ्यादेखत काही घेऊन पळून जातात. किंवा आमच्या पाठीमागं डाव साधतात. पूषा, तू अशा भुरट्याला पकड अन चांगला कुबलून काढ.

वाटदेवा पूषा, तुला आम्ही हे सांगतो ते तू गडीमाणूस म्हणून नाही. तू विचारी आहेस, देखणा म्हणजे सुंदर आणि डोळस आहेस. आमच्या वाडवडलांचा सुद्धा तूच पाठीराखा होतास, तसाच आमचाही रहा.

जगातलं सगळं वैभव तुझं आणि ते जतन करण्यासाठी तुझी हत्यारंसुद्धा सोन्याची. तेव्हा नुसतं आमचं रक्षण करून थांबू नको. तुझ्यातली काही धनसंपदा आम्हालाही दे. ती सगळी चिकटपणानं आम्ही स्वतःजवळच ठेवावी असं नको. संपत्तीबरोबर ती दान करण्याची बुद्धीही दे.

वाटदेवा, प्रवासाची आमची वाट सोपी, अभयी ठेव. आडवाटेला आम्हाला जाऊ देऊ नकोस. तिकडं ने आमच्या शत्रूंना. वैराणातली वाट आम्हाला नको. आमच्या वाटेच्या दोन्ही बाजूला हिरवेगार मळे, बहरलेल्या राया असू देत. तू शक्ती दे, त्या सुंदर वाटेने आम्ही चालत राहू; संपत्ती दे, दान देऊ. सगळे काही पोटभर दे, पूषा, हा पत्कर तू घे.

तू तो घेशीलच, पण काही उणंअधिक झालं तरी आम्ही तुला बोल लावणार नाही. तुझी आळवणी करू आणि हवे ते मागून घेऊ.

'वाटदेवा, जीवन हा प्रवासांचा प्रवास आहे. त्याच्या वाटेचा देवही तूच हो' असं स्पष्टपणे म्हटलं नसलं तरी ही प्रार्थना करणारांच्या मनातली इच्छा म्हणता येईल.

❑❑❑

# केसोबा : केशिसूक्त

केसोबा हा आग, पाणी   धरी आकाश धरणी
करी जगाची पाहाणी   तेज केसोबा नावानी ॥ १ ॥

मुनी वारा कमरेले   मळे धडुते ल्यालेले
वारेगतीने चालले   जणू स्वता देव झाले ॥ २ ॥

'मौनी आम्ही समाधीत   वाऱ्यापरी विरळत
आमची ही शरीरेच   तुम्ही माणसे पाहत' ॥ ३ ॥

अंतराळातून जातो   जगदेखावे पाहतो
देवांचाही मुनी होतो   सखा सुकृती आम्हा तो ॥ ४ ॥

वारियाचा घोडा सखा   मुनी देवां हवा देखा
दोन्ही समुद्रांच्या पाखा   शिवे पूर्वपश्चिम का ॥ ५ ॥

अप्सरा मृग गंधर्व   यांच्या पाउली चालता ।
केशी जगाचा जाणता   मित्र गोड भाळवीता ॥ ६ ॥

वायूने तो घुसळीला   धरणीमाईने पीटला ।
केशी, विषपात्राने जो   रुद्रासंगे घोट प्याला ॥ ७ ॥

❑

दिवसा सगळीकडं उजेड असतो आणि डोक्यावर फक्त आकाश दिसत असतं आकाशात एकटा एक सूर्य. त्याच्याकडं पाहतासुद्धा येत नाही.

रात्री सगळं बदलतं. आकाश दिसतं; पण दिवसा निळसर रंग लावल्यासारखं दिसतं तसं नाही. चमचम करणारे ठिपके त्याच्यावर सगळीकडं दिसतात.

त्यांच्याकडं टक लावून पाहता येतं. त्यामुळं त्यांच्यातला फरकसुद्धा सहज लक्षात येतो. काही ठिपके थेंबासारखे बारीक दिसतात, काही टिकलीसारखे अंधुक असतात, काही खडीसाखरेच्या खड्यासारखे पाणसळे दिसतात, तर काही फोडलेल्या गारेसारखे चमचमतात. चांदोमामांची वेगळीच तऱ्हा! त्यांची कधी दिसेल न दिसेलशी कोर असते तर कधी चांदीच्या ताटासारखा गोल.

मधेच एखादा ठिपका सरसरा घसरायला लागतो अन् पेटल्यासारखा उजेड पाडीत खाली येतो. जसजसा खाली येईल तसतसा त्याच्या उजेडाचा लोळ दिसत राहतो. अन् थोड्याच वेळात सारं संपून जातं.

कधीतरी काही वेगळं होतं. सकाळी सूर्य उगवायच्या आधी पूर्वेला, किंवा संध्याकाळी तो मावळायला जाताना पश्चिमेला, एक अनोळखी ठिपका दिसायला लागतो. कालपर्यंत नव्हता तो तिथं. पुन्हा दुसऱ्या रात्रीही दिसतो, पण कालच्याच जागी नव्हे, थोडा सरकलेला. अन् मग तो दिसतच राहतो काही दिवस. पण त्या ओळखीच्या ठिपक्यांहून अगदी निराळा. एक तर तो रोज जागा बदलीत असतो. त्याहून विलक्षण म्हणजे त्याच्या मागच्या बाजूला केस म्हणा, पिसारा म्हणा, शेपूट म्हणा–असा उजेडाचा पसारा दिसायला लागतो. हा पसारा रोजच्या रोज वाढतच जातो. दिवाळीतला भुईनळा कसा आधी जरासाच पेटतो अन् मग त्याची चमक विखरून पसरायला लागते तसे त्या ठिपक्याचे केस वाऱ्यावर सोडल्यासारखे लांबवर पोचायला लागतात. माणसांना वाटतं, हा काय चमत्कार आहे बुवा !

आणखी चमत्कार पुढंच असतो. काही दिवस हे केस लांबलांब पसरत जातात आणि मग आखडायला लागतात. प्रचंड वाढलेले केसोबा हळू हळू दिसेनासे होतात. नाहीसे झाले की काय, असं माणसांना वाटतंय तों काही दिवसांनी पुन्हा दिसायला लागतात. मात्र पहिल्या जागी नाही, भलतीकडंच. आपला केसारा साग्रसंगीत बरोबर घेऊन. अन् हे काय? आधीच्या वेळी डोकं पुढे, केस मागे असे चालले होते, आता केस पुढे, डोकं मागे असे चाललेयत..चाललेयत. केसारा कमी कमी होतोय..केसोबा ठिपकुले व्हायला लागलेयत. दिसेनासे होतायेत, झाले,..गेले!

कधीतरीच अशी मंडळी पाहुण्यासारखी आपल्याला दिसणाऱ्या आकाशात यायची अन् काही न बोलता निघून जायची. त्यात त्यांचं लहान-मोठं-लहान होणं. वेदकाळातल्या माणसांना त्याचं कौतुक वाटलं. त्यांनी त्यांच्याबद्दल कायकाय कल्पना केल्या आणि गाणी पण रचली. गाणी लिहिली म्हणालो नाही, कारण ही वेदातली गाणी तोंडांनी म्हणूनच लक्षात ठेवायची त्यांची रीत होती.

त्यातलं एक गाणं केशिसूक्त म्हणून आहे. केशी म्हणजे केसाळ, केसोबा. खरं म्हणजे आकाशातली केसाळ मशाल. ज्योति. हल्ली मराठीत केसोबाला आपण धूमकेतू म्हणतो. या सूक्तात सगळीकडे त्याला केशी असंच म्हटलं आहे. तरी धूमकेतूचं शेपूट केसांचं नाही हे कवीला माहीत होतं. ते अग्नीसारखं उजळ असतं, पाण्यासारखं पाणसर दिसतं. म्हणून कवी म्हणाले, 'केसोबा म्हणजे, अग्नी, पाणी!' त्याचा प्रचंड आकार पाहून म्हणाले, 'हा स्वर्गाला सुद्धा उचलून धरतोय असं वाटतं. पण एका जागी उभा नाहीए. चळतोय. जग पहायला निघालाय वाटतं.'

आपल्या समाजात वेदकाळापासूनच साधूसंन्यासी, ऋषीमुनी चहूकडे हिंडत असायचे. बहुतेकांचे केस वाढवलेले, कमरेला जेमतेम लंगोटी; ती करदोट्यात अडकवलेली. नाहीतर गुडघ्यापर्यंतचं गुंडाळलेलं वस्त्र; रंग मातट. अंगावर धूळ साचली तरी काळजी नाही. कवीला वाटलं हे धूमकेतू या मुनींसारखेच भटके, मनाला येईल तेव्हा येणारे न् जाणारे आहेत. वाऱ्याच्या गतीनं जातात. त्यांच्या अंगावरचे मळकट कपडेसुद्धा वाऱ्यासारखे विरळ. नाही, हे मुनी कसचे, देवच झाले म्हणाना.

त्यावर केसोबा सांगतात, 'आम्ही कधी बोलत नसल्यानं, मौनव्रताच्या जोरावर, समाधीत असल्यासारखे आमच्याच तंद्रीत असतो. तुम्ही आत्ता जे पहात आहात ते आमचं शरीर. वाऱ्यासारखं विरळ झालेलं आहे.' कवीला वाटतं, खरंच. हा मुनी पृथ्वी आणि आकाश यांच्या मधल्या जागेतून सगळीकडं उजेड फैलावीत चाललाय. कशासाठी? अर्थातच आम्हा लोकांच्या भल्यासाठी. आमचा मित्रच. तसा वायूचाही मित्रच.

याचा पसारा केवढा मोठा! आमच्या देशाच्या पूर्वेला आणि पश्चिमेला समुद्र आहेत. ही स्वारी जणू काही त्या दोन्ही समुद्रांना शिवून राहिली आहे. अंतराळात अप्सरा, गंधर्व आणि मृगासारखी नावं दिलेले नक्षत्रतारे चालत असतात- त्यांच्या पावलावर पावलं टाकून हाही जातो. आणि एवढा मोठा. त्याला नक्कीच सगळ्या जगाचं ज्ञान असणार!

त्यावर केसोबा सांगतात, आकाश निळंनिळं पाहता ना? तो निळा रंग रुद्रदेवाने घोट घेतलेल्या विषाचा आहे. त्या आकाशी रुद्रदेवासारखेच आम्ही. आम्ही काय घोटलं ते वायूनं घुसळलं होतं अन् धरणी मायनं पिटलं होतं.

कवीनं अशा कल्पना आपल्या भोवतालच्या जीवनावरून केल्या. ताक घुसळताना फेस वर येतो किंवा धान्य कांडताना कोंडा उडत असतो. तो फेस किंवा कोंडा आभाळात फिसकारावा तसं धूमकेतूचं शेपूट दिसतं.

म्हणजे झालं काय, की या शेपटावरून त्याला केशी किंवा केसोबा म्हटलं आणि नंतर केसोबांना मुनी, फिरस्ता, देव, माणसांचा मित्र असं काय काय म्हटलं. ते म्हणताना, कधी त्याचं स्वरूप, कधी त्याचं फिरणं, तर कधी मधूनच उपटणाऱ्या या पाहुण्यानं आपलं भलं करावं अशी इच्छा, ही कारणं झाली.

या गडबडीत, वेदांचा पाठ करणारी मंडळी केशीसूक्त म्हणत राहिली; पण ते केसोबा म्हणजे धूमकेतू हे मात्र विसरून गेली !

□□□

# जुळ्या जोडीचे गाणे : अश्विनौ

पाटा-वरवंटा जोडी  तसे यावे कामा घरी
जोडी गरुडांची जशी  उतरावी झाडावरी
सूक्ते गाणारांची जोडी  यज्ञातली ब्राह्मणांची
जणू धाडली राजाने  दूर दुक्कल दूतांची ॥ १ ॥
भल्या सकाळीच येती  वीर रथी नि सारथी
पुष्ट एडके जोडीने  तसे तुम्ही दोघे येणे
जायापती जी शोभती  तसे तुम्ही या जाणती ॥ २ ॥
शिंगजोडी का बैलाची  तशी आघाडी तुमची
घोडेखुरांची का जोडी  टपटपते धावरी
जोडपे का चकव्यांचे  जुळले जे सकाळचे
रथी सारथी संयुक्त  तसे सामोरे यावेत ॥ ३ ॥
नावेची ह्या वल्ही दोन  जिणें न्यावया तारून
तुम्ही आस–जू रथाचे  किंवा धाव–पैंस त्याचे
वाघे दोघे दो बाजूला  तसे संभाळा आम्हाला
कुवड्या का लंगड्याला  तसे सावरा आम्हाला ॥ ४ ॥
वारे सदा जे तरुण  नद्या वाहत्या का दोन
डोळे समोर पाहते  तसे तुम्ही यावे येथे
हात दोघे लांबसोट  शुभ कर्मे करीतात
उजू-डाव्या पायांपरी  न्यावे आम्हा लक्ष्मीघरी ॥ ५ ॥
ओठ वरचे खालचे  मुखी मधुर बोलते
स्तन दोन् का आईचे, दूध पाजा जीवनाचे
नाकपुड्यांपरी दोन  करा तनूचे रक्षण
ज्ञान ऐकणारे कान  दोन तसे या अश्विन ॥ ६ ॥
दोन हात जशी देती  तशी आम्हा द्यावी शक्ती
पृथ्वी-आकाशांच्या परी  ठाव-पाणी करा पुरीं
अश्विनहो साऱ्या वाचा  व्हाव्या सर्वथा तुमच्या
शाणावरी तलवार  घासा तशा धारदार ॥ ७ ॥
थोर आळविली गाणी  गृत्समद-वंशजांनी
त्यांनी दोघे समाधानी  यावे पुढारी होऊनी ॥ ८ ॥

❑

जुळी भावंडं अगदी सारखी असतात, दिसतात, हसतात, रुसतात. सगळ्या गोष्टी सारख्याच करतात. दोघं मिळून काही करायला लागली तर दुप्पट परिणाम होणार ना!

मग देव जुळे असले तर? तर काय? त्या जुळ्या देवाच्या भक्ताची मजाच दोघांना मिळून एकच प्रार्थना करायची, आमच्या घरी या म्हणायचं, प्रत्येक वेळी दोघांना मागणं मागायचं —एकाच प्रार्थनेत दुप्पट लाभ होणार.

वेदात अश्विन नावाचे असे जुळे देव आहेत. इतर देवांच्या सूक्तात ऋषी म्हणतात, 'देवा, तू ये; असं कर, तसा आहेस..' अश्विनांना म्हणतात, 'तुम्ही दोघं या, दोघादोघांच्या इतर जोड्या जशी कामं करीत असतात तसे तुम्ही दोघे पण कायकाय करा...'

बघा. एकच दगड असला ना, तर काहीच करीत नाही. दोन असले तर एकत्र आणून आपल्या हवे ते करून घेता येते. पाटा-वरवंटा म्हणजे दगडांची जोडीच ना. पाट्यावर वरवंटा फिरवून काय मऊसूत वाटण करता येतं! किंवा उखळ अन रगडा. गहू तांदूळसुद्धा कांडता येतात उखळात. पाट्यावर किंवा उखळात सोमाची वनस्पती वाटून कुटून सोमरस मिळवता येतो. अश्विनांनो, हे दोन दगड येतात तसे तुम्ही जोडीने या.

आमच्या यज्ञातला पाहुणचार घ्यायला या. कसे या? गरुडांची जोडी कशी आकाशातून झेपावत झाडाच्या शेंड्याकडे येऊन अलगद बसते तसे या. राजाच्या दूतासारखे या. लांबच्या गावातल्या माणसांना काही कळवायचं असलं तर राजा काही स्वत: तिथं जात नाही. दोन दूतांची जोडी पाठवतो. एकाला काही झालं तर दुसरा आहेच. शिवाय ते एकमेकांवर नजर पण ठेवतात. तर, तुम्ही इंद्रराजाचे दूत होऊन या. इथं यज्ञातसुद्धा सूक्तं म्हणायला ब्राह्मणांची जोडी असते. यज्ञाचे पाहुणे म्हणून तुमची जोडी येऊ द्या.

बाकी पाहुणेरावळे येतात—सकाळी सकाळी, रथात बसून; दोघी दोघी देखण्या बायका, एकमेकांना शोभणारी जोडपी... थाटामाटानं येतात. यज्ञातल्या मेजवानीसाठी दोन मेंढे आणतात. तसे तुम्ही जुळे या. तुम्ही काही नवखे नाही. यज्ञयागांची सारी माहिती तुम्हाला आहेच.

तुम्ही जुळे या. चालत्या बैलाची जुळी शिंगं पुढं येत असतात, धावत्या घोड्याचे जुळे खूर टपाटप पुढं पडत असतात तसे या. रोज रात्री चकवा (चक्रवाक) पक्ष्यांची

जोडी दुरावलेली असते आणि सकाळी पुन्हा जुळते तसे जुळून या. शत्रूवर चालून जाणारा रथी वीर आणि रथाचा सारथी असे दोघे रथातून जात असतात तसे दोघे या.

रथ जमिनीवर चालतात. नावा समुद्रावरून. त्या जशा समुद्रापार नेतात तसे तुम्ही आम्हाला अडचणींच्या पार न्या.

रथाचा आस आणि जू, किंवा रथाचा पैस आणि चाकाच्या धावा, दोन्ही दोन्ही जुळून पुढे धावतात तसे जुळून या. कुत्र्यांची जोडी धन्याच्या बरोबर चालताना त्याच्या अंगाला कुणाचा धक्का लागू देत नाही तसे आम्हाला संभाळीत आमच्या बरोबर चला. लंगडणाऱ्याला सावरणाऱ्या दोन कुबड्यांप्रमाणे आम्हाला सावरीत जीवनातून न्या.

वाऱ्याच्या तरुणाईनं, नदीच्या तरलपणानं, थेट समोर पाहणाऱ्या डोळ्यांप्रमाणं सरळ या. लांबसडक दोन हातांप्रमाणे शुभंकर व्हा. दोन पायांप्रमाणे आम्हाला समृद्धीकडे न्या.

तरी धन, लक्ष्मी, प्रत्यक्ष जीवनापेक्षा उण्याच गोष्टी. ते जीवन आई देत असते. जुळे ओठ मुखाने मधुर बोलतात तसे बोलत, आईचे दोघे स्तन जसे बाळाला पाजतात तसे तुम्ही दोघे आम्हाला भरवा. जुळ्या नाकपुड्या श्वासानं जीवनाचं रक्षण करतात तसे तुम्ही करा. दोन कान चांगल्या गोष्टी ऐकवतात तसे तुम्ही आम्हाला ऐकवणारे व्हा. हातांची जोडी आम्हाला शक्ती देते तसे तुम्ही द्या. पृथ्वी आणि आकाश मिळून आम्हाला जागा, पाणी देतात तसे तुम्ही द्या. ही आमची वाणी तुमचीच आळवणी करण्यासाठी लखलखीत ठेवा –निसण्यावर घासल्यानं तलवार धारदार होते तशी.

अश्विनहो, गृत्समद ऋषींच्या घराण्यातल्या आम्ही तुमची ही स्तोत्रं म्हटली. तुमच्याही अंगावर ती मूठभर मांस चढवतील. तुम्ही पुढारी, मार्गदर्शक. या स्तुतींनी आनंदित होऊन आमच्यापाशी या. म्हणजे, हे वीरांनो, यज्ञात तुमची आणखी स्तुती करू.

जुळे भाऊ म्हणून ज्यांची प्रार्थना केली ते अश्विन देव कोण होते? उखळ-मुसळ, पक्षी-पक्षीण, रथी-सारथी, खालचे-वरचे ओठ, डावे-उजवे हात? नाही, त्यांची फक्त उदाहरणं दिली. देव पृथ्वीवरचे बहुधा नसायचेच, आकाशातले असायचे. त्यातल्या त्यात, आकाशात चमकणारे झळाळणारे सूर्य चंद्र हे सगळ्यात मोठे, निदान पहिले तरी. त्यांना सूर्य-चंद्र म्हणूनही त्यांची गाणी म्हटली किंवा अग्नी, इंद्र अशी 'देवां'ची नावं देऊनही त्यांची सूक्तं गायिली. त्यांच्या पाठोपाठ, रात्री चकाकणारे तारे. त्यातल्या

त्यात चंद्र ज्यांच्या जवळपास दिसतो ते तारे; त्यांना नक्षत्रं म्हणत. ही नक्षत्रं दिवसा दिसायची नाहीत. पहाटे, सूर्य उगवायच्या आधी थोडावेळ अंधुक दिसायची. अशी सूर्य उगवताना पूर्वेला आणि सूर्य मावळताना पश्चिमेला जी दिसायची ती सत्तावीस नक्षत्रं आपल्या पूर्वजांनी मोजली होती. ती सगळीच सारखी तेजस्वी नाहीत. जी जास्ती तेजस्वी त्यांना महत्त्व दिलं. सगळ्यांना गमतीदार नावं दिली : हरीण, घोडेस्वार, साप, हात, मोती, काटा... वगैरे. त्यातले जुळे अश्विन. वेदातले अश्विनौ. जुळे का, तर ते दोन ठळक तारे खूप जवळजवळ दिसतात, एकदमच उगवतात. अश्विनौ म्हणजे घोडेस्वार. तशी त्यांना दुसरीही नावं होतीच. पुनर्वसू, मिथुन (म्हणजे जोडपं), यम-यमी वगैरे. मग वेदातल्या कवींना असं वाटलं की नवराबायकोच्या जोडप्यांनी या जुळ्या देवांची, जोडदेवांची प्रार्थना केली तर त्यांचं भलं होईल.

त्यामुळं अग्नी, इंद्र, वरुण या देवांच्या खालोखाल या जुळ्या अश्विनांची सूक्तं वेदात आली आहेत. त्यांतलंच हे एक, सगळ्या जुळ्यांच्याच नामावळ्या देणारं.

❑❑❑

## रात्रमाउली : निशासूक्त

रात्र ऐसपैस   जगा चांदण्यांनी पाहे
    सारी लक्ष्मी ल्याली आहे ॥ १ ॥

भरी अमृताई   जग सारे वरती खाली
    तेजें काळोखा बाधली ॥ २ ॥

येत येत देवी   उषा सजवी धाकटी
    दूर काळोखाला लोटी ॥ ३ ॥

ती आत्ता आमची   विसावलो तिच्या कुशी
    जशी पाखरे झाडाशी ॥ ४ ॥

पोचलेत गावा   प्राणी पाळीव नी पक्षी
    ससाणेही दूरलक्षी ॥ ५ ॥

घालवी लांडगे   चोरपोर, तरंगिणी!
    आणि आम्हां हो तारिणी ॥ ६ ॥

सारे झाकोळिता   उषे, काळोख भोवता
    करी रीणसा मागोता ॥ ७ ॥

गोडवे गाईचे,   आकाशाच्या लेकी तुझे
    ऐक, पाव, देई जय ॥ ८ ॥

❑

आपलं अर्धं आयुष्य रात्रीत जातं.
आपली अर्धी पृथ्वी रात्रीत असते.
आपल्या पायापासून वर आकाशापर्यंत रात्रच रात्र असते.

इतकी ही रात्र ऐसपैस असते. दिवसाउजेडी दूरवरचं दिसलं, तरी आकाश सगळीकडून जमिनीला टेकलेलं दिसल्यामुळे आपलं जग मर्यादित असतं. रात्रीच्या काळोखात चार हातावरचंसुद्धा दिसत नसलं म्हणजे आपल्या भोवतालची रात्र अमर्याद वाटायला लागते.

पण वर आकाशाकडं पहायला लागलं तर चांदण्या लुकलुकताना दिसतात. जणूकाही या ऐसपैस, आकाशभिडू रात्रीचे तेजस्वी डोळेच ! आणि या चांदण्या चहूकडे चमकत असतात. जणू या रात्रीनं सगळ्या अंगावर लक्ष्मी उधळून घेतलीये. रात्रीबाईंचं ठीक आहे, अंधारबुवांचं काय? त्या रत्नांसारख्या चांदण्या, रात्रीला भूषण पण अंधाराला दूषण. त्यांचा उजेड लांब त्या तिथून आपल्यापर्यंत येतो, तो मधल्या काळोखाला भेदूनच! तर, अशी ही रात्र काळोखाला बाधते. अन् काही वेळानंतर तर ही निशाताई आपली धाकटी बहीण उषा हिला नटवून सजवून पुढं आणते. ही कानामागून येऊन तिखट झालेली उषा त्या काळोखाला सरळ घालवूनच देते !

काळोखरावांचं काही असो. आम्ही माणसं मात्र या रात्रीला आमची मानतो. आम्ही या माउलीच्या कुशीत शिरतो. दिवसाउजेडी आम्ही पाखरांसारखे इकडं तिकडं भिरभिरत असतो; आता झाडावर येऊन बसणाऱ्या पाखरांसारखे रात्रीत शिरतो! आमची चारपायी पाळीव जनावरं दिवसा चरणीसाठी रानात गेली होती ती रात्रीची गावात परत येतात. दोनपंखी पाखरं पण आली आहेत, आणि त्यांच्यावर झेप घालणारे ससाण्यांसारखे वेगवान पक्षीही विसावले आहेत.

लांडग्यांसारखे शिकारी प्राणी आणि चोरी करणारे मनुष्यप्राणी मात्र आपल्या उद्योगाला बाहेर पडले आहेत. काळोखाच्या लाटांवर लाटा आणणाऱ्या रात्रीमाय, त्यांना दूर काळोखात घालवून दे. आम्हाला मात्र त्या लाटांवरून तरंगवीत ने. आमच्या अगदी जवळ असलेला काळोख जगभर पसरलेल्या काळोखाचा भागच आहे. तरीपण आमच्या घराबाहेरचा काळोख संपला तरी हा रेंगाळत असतो आमच्याभोवती. रात्रीच्या पाठची बहीण उषाताई, ह्या अंधाराला परतवायचं काम तुमचं. रीण काढलेलं परत करावं ना, तसं या काळोखाला तुम्ही माघारी लावा.

हे सगळं म्हणून झाल्यावर, वेदकाळातला तो कवी म्हणतो, 'रात्री ग, उठल्याबरोबर आम्ही गाईकडं जातो आणि दूध मागतो. तसेच पुढच्या दिवसभर यश मिळत रहावं म्हणून देवदेवतांच्या प्रार्थना करतो. तू आकाशाची, स्वर्गाची कन्या. आम्हाला थंडगार विसावा देऊन ताजं तवानं केलंयस. म्हणून, तू चाललीयस तर तुझीही स्तुती अन प्रार्थना करतो. आम्हाला विजयी कर !'

□□□

# विश्वकर्मा

ज्याने ही सगळी जगे चेतवीली
ऋषी, गाता, पिता बैसला जवळीं
आळविता, द्रव्य मेळविण्यासाठी
पहिला असोनि रिघाला धाकुटीं ॥ १ ॥

कसली होती त्याची बैठक, साधन-
कोणते, आणिक स्वतः कसा कोण
जेथ विश्वकर्मा घडविली भूमी,
स्वर्ग उभा केला सर्वाक्षें महिमीं ॥ २ ॥

विश्वतः डोळे विश्वतः मुखेही
विश्वतः त्यास हातही पायही
हातांनी चालना चहूवार देतो
पायांनी एकटा स्वर्भू उभारीतो ॥ ३ ॥

कोण्या वनी वृक्ष कोणता तो होता
ज्यातून कोरिले स्वर्गाला पृथ्वीला
विचारींनो मना आपुल्या पुसा हे
विश्वाला आधारा काय उभे आहे ॥ ४ ॥

शरीरे रूपे जी उत्तम मध्यम
अथवा कनिष्ठ देवा विश्वकर्मा
देई लाडक्यांना हवीसाठी, स्वता-
सेवावी याजक होउनीया मोठा ॥ ५ ॥

हवीने होऊन विश्वकर्मा मोठा
पूजी स्वर्गपृथ्वी इथे स्वता आता
आसपास लोक अचंबित व्हावे
धनवंत देवे फल आम्हा द्यावे ॥ ६ ॥

वाणीच्या देवाला या विश्वकर्माला
मनवेगवंता बोलावू यज्ञाला
त्याने अमुच्या साऱ्या सेवाव्या आहुती
कल्याणी सत्कर्मी संभाळो आम्हासी ॥ ७ ॥ ❑

यज्ञ करायचा म्हटलं की किती किती गोष्टी कराव्या लागतात. किती किती जण त्या करीत असतात अन हव्या त्या वस्तू तयार करतात.

यज्ञासाठी आधी भूमी तयार करायला लागते. इकडची माती तिकडे, तिकडची माती इकडे करावी लागते. मग वेदीसाठी विटा. त्या कुठेतरी नदीच्या काठी बनवायच्या. त्यांच्यासाठी गाळाची माती, पाणी, चिखल, भट्टी, जळण काय न् काय. विटांनी वेदी रचून झाली की पाहुण्यांसाठी मांडव. त्याला जंगलातून खांब, वासे आणायचे. ते कापून जोडून बांधून वर आकाशासारखं छत घालायचं.

आणखी सामुग्री जमा करायची. आधी वेदीतल्या अग्नीसाठी जळण. अग्नीला आहुती किंवा हवी अर्पण करण्यासाठी तूप हवं. ते आपल्या हाळींनी अग्नी सगळ्या देवांना पोचवणार. यज्ञातली पुरोहित मंडळी देवांना 'इकडे या' म्हणून आग्रह करीत असतातच. देव हे अग्नीचे पाहुणेच म्हणा.

अन यज्ञ करणाऱ्या यजमानाचे पाहुणेही यायचे असतातच. त्यांना तृप्त करण्यासाठी धान्य, भाज्या, मांसासाठी पशुपक्षी हे सारं आणावंच लागतं. तेही कोणीकोणी तयार केलेलं असतं.

पण हे सगळं आपल्याला पृथ्वीवरून आणि आकाशातून मिळत असतं. शेतकऱ्यानं धान्य पिकवलं, कुंभारानं वीट बनवली, सुतारानं खांब तासला–तसं ही पृथ्वी आणि हे आकाश, हे सारं विश्व हे कुणी बरं बनवलं असेल?

हं. पृथ्वीवर आपलं सगळं जीवन चालतं ते सूर्याच्या जिवावर. सूर्य म्हणजे अग्नीच ना आकाशातला! अन पृथ्वीवर जे जे काही आहे ते सगळं खाऊन टाकतो तोही अग्नीच. यज्ञातली आहुती त्या विश्व उभं करणाऱ्या देवाला पोचवणाराही अग्नीच. अग्नी तरी कुणी बनवला असेल? विश्व म्हणजे सर्व; तर विश्व बनवणारा विश्वकर्मा. त्यानंच अग्नी पण बनवला, असणार. आम्हाला –यज्ञ करणारांना– बनवणाराही तोच ना; कारण 'विश्व'मध्ये आम्हीही आलोच. म्हणजे इंद्र, वायू, पाऊस, वाटदेव... या सगळ्या देवांचाही देव हा विश्वकर्मा... हा स्वतःच एक यज्ञ करून राहिला आहे जणू.

त्या यज्ञात, आम्हाला ठाऊक असलेली आणि नसलेली सगळी जगे तो आहुती म्हणून टाकू शकतो. त्यासाठी वेदीच्या शेजारी तो आसन मांडील. पण आहुती टाकणार ती पोचणार पुन्हा त्यालाच. हे फारसं बरं वाटलं नाही म्हणून की काय विश्वकर्म्यानं यज्ञ करण्यासाठी आम्हाला जन्म दिला. विचार असा की आम्ही त्याची प्रार्थना करावी,

मग तो आम्हाला हवं ते धनद्रव्य देईल. एवढा मोठा विश्वकर्मा, देवादिकांनासुद्धा जीवन देणारा, इतक्या खालच्या वर्गातल्या जीवांमध्ये, वस्तूंमध्येसुद्धा रिघावला.

म्हणून आम्ही यज्ञाला बसलो आहोत, तसा तो विश्वकर्मा बसला असेल तेव्हा त्याचं आसन काय बरं असेल? त्याची साधनसामुग्री काय असेल? ही पृथ्वी जिथून घडवली, स्वर्गही जिथून उभा केला ते स्थान कसलं असेल? हे काम केवढं अन् ते सगळं पाहणारा विश्वकर्मा तोही किती मोठा !

किती मोठा. विश्व भरून त्याचे डोळे, त्याची मुखे, त्याचे बाहू, त्याचे पाय ! तो एकटाच आपल्या हातांनी स्वर्गपृथ्वीला प्रेरणा देतो अन पायांनी त्यांना उभे करतो.

घर उभं करणारा सुतार असतो तसा विश्व उभं करणारा हा विश्वकर्मा आहे. पण ते उभं करायला त्यानं कोणता बरं वृक्ष कापला, तासला? अन कोणत्या बरं वनात तो वृक्ष होता? मला तर कळत नाही म्हणून थोर विचारी माणसांना मी म्हणतो – तुम्ही आपल्या मनाला विचारा, ह्या सगळ्या जगांना आधार होऊन राहिलंय ते काय आहे?

ते जे काय असेल त्याला विश्वकर्मा म्हणून मी आवाहन करतो, बोलावतो. विश्वकर्मा, आम्ही तुझे मित्र. तू ज्या कोणत्या मोठ्या, मध्यम वा छोट्या रूपांत या जगात आला आहेस ती आम्हाला सांगून दे. हवी, आहुती आम्ही ती सारी यज्ञासाठी गोळा करतो. म्हणून ती तुलाच मिळायची आहेत. तेव्हा ये. हे यजन तूच कर. त्या आहुती टाकल्यावर अग्निरूपातले तुझे शरीर पुष्ट कर. आहुतींनी मोठा हो. स्वर्ग-आकाश, पृथ्वी ही तुझीच मोठी रूपे. आहुतींनी मोठा झाल्यावर त्या मोठ्या रूपांचं पूजन तूच कर. आमच्या वतीनं. मग तुम्ही सारे प्रसन्न होऊन आमची मागणी पुरवा. आमच्या आसपास जे कोणी लोक आहेत ते चकित झाल्यामुळे त्यांना काही सुचणार नाही असं करा. आमच्या हवींनी धनवंत होऊन आम्हाला हवे ते फल द्या.

विश्वकर्मा वाणीचाही धनी आहे. मनासारखा वेगवान आहे. त्याला तृप्त करण्यासाठी आम्ही या यज्ञाला बोलावीत आहोत. आम्ही आगीत जेवढ्या आहुती टाकू त्यांचे सेवन विश्वकर्मा करो. मग परतफेड म्हणून तो साधुकर्मा, सगळ्या जगाला सुख देणारा विश्वकर्मा, आमचा संभाळ करो !

❑❑❑

# अग्नी : अग्निसूक्त [१.१]

अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम् ।
होतारं रत्नधातमम् ॥ १ ॥

अग्निः पूर्वेभिर्ऋषिभिरीड्यो नूतनैरुत ।
स देवाँ एह वक्षति ॥ २ ॥

अग्निना रयिमश्नवत् पोषमेव दिवेदिवे ।
यशसं वीरवत्तमम् ॥ ३ ॥

अग्ने यं यज्ञमध्वरं विश्वतः परिभूरसि ।
स इद् देवेषु गच्छति ॥ ४ ॥

अग्निर्होता कविक्रतुः सत्यश्चित्रश्रवस्तमः ।
देवो देवेभिरा गमत् ॥ ५ ॥

यदङ्ग दाशुषे त्वमग्ने भद्रं करिष्यसि ।
तवेत्तत्सत्यमङ्गिरः ॥ ६ ॥

उप त्वाग्ने दिवेदिवे दोषावस्तर्धिया वयम् ।
नमो भरन्त एमसि ॥ ७ ॥

राजन्तमध्वराणां गोपामृतस्य दीदिविम् ।
वर्धमानं स्वे दमे ॥ ८ ॥

स नः पितेव सूनवे अग्ने सूपायनो भव ।
सचस्वा नः स्वस्तये ॥ ९ ॥

# पहाटेच्या देवता : उषासूक्त [६.६५]

उदु श्रिय उषसो रोचमाना अस्थुरपां नोर्मयो रुशन्तः ।
कृणोति विश्वा सुपथा सुगान्यभूदु वस्वी दक्षिणा मघोनी ॥ १ ॥

भद्रा ददृक्ष उर्विया वि भास्युत्ते शोचिर्भानवो द्यामपप्तन् ।
आविर्वक्षः कृणुषे शुम्भमानोषो देवि रोचमाना महोभिः ॥ २ ॥

वहन्ति सीमरुणासो रुशन्तो गावः सुभगामुर्विया प्रथानाम् ।
अपेजते शूरो अस्तेव शत्रून् बाधते तमो अजिरो न वोळ्हा ॥ ३ ॥

सुगोत ते सुपथा पर्वतेष्ववाते अपस्तरसि स्वभानो ।
सा न आ वह पृथुयामन्नृष्वे रयिं दिवो दुहितरिषयध्यै ॥ ४ ॥

सा वह योक्षभिरवातोषो वरं वहसि जोषमनु ।
त्वं दिवो दुहितर्या ह देवी पूर्वहूतौ मंहना दर्शता भूः ॥ ५ ॥

उत्ते वयश्चिद्वसतेरपप्तन्नरश्च ये पितुभाजो व्युष्टौ ।
अमा सते वहसि भूरि वाममुषो देवि दाशुषे मर्त्याय ॥ ६ ॥

❑

# सोनसळा सूर्य : सूर्यसूक्त [१.३५]

ह्वयाम्यग्निं प्रथमं स्वस्तये ह्वयामि मित्रावरुणाविहावसे ।
ह्वयामि रात्रीं जगतो निवेशनीं ह्वयामि देवं सवितारमूतये ॥ १ ॥

आ कृष्णेन रजसा वर्तमानो निवेशयन्नमृतं मर्त्यं च ।
हिरण्ययेन सविता रथेनाऽऽ देवो याति भुवनानि पश्यन् ॥ २ ॥

याति देवः प्रवता यात्युद्वतायाति शुभ्राभ्यां यजतो हरिभ्याम् ।
आ देवो याति सविता परावतोऽप विश्वा दुरिता बाधमानः ॥ ३ ॥

अभीवृतं कृशनैर्विश्वरूपं हिरण्यशम्यं यजतो बृहन्तम् ।
आस्थाद् रथं सविता चित्रभानुः कृष्णा रजांसि तविषीं दधानः । ४ ।

वि जनाञ्छ्यावाः शितिपादो अख्यन् रथं हिरण्यप्रउगं वहन्तः ।
शश्वद् विशः सवितुर्दैव्यस्योपस्थे विश्वा भुवनानि तस्थुः ॥ ५ ॥

तिस्रो द्यावः सवितुर्द्वा उपस्थाँ एका यमस्य भुवने विराषाट् ।
आणिं न रथ्यममृताधि तस्थुरिह ब्रवीतु य उ तच्चिकेतत् ॥ ६ ॥

वि सुपर्णो अन्तरिक्षाण्यख्यद् गभीरवेपा असुरः सुनीथः ।
क्वेदानीं सूर्यः कश्चिकेत कतमां द्यां रश्मिरस्या ततान ॥ ७ ॥

अष्टौ व्यख्यत् ककुभः पृथिव्यास्त्री धन्व योजना सप्त सिन्धून् ।
हिरण्याक्षः सविता देव आगाद् दधद्रत्ना दाशुषे वार्याणि ॥ ८ ॥

हिरण्यपाणिः सविता विचर्षणिरुभे द्यावापृथिवी अन्तरीयते ।
अपामीवां बाधते वेति सूर्यमभि कृष्णेन रजसा द्यामृणोति ॥ ९ ॥

हिरण्यहस्तो असुरः सुनीथः सुमृळीकः स्ववाँ यात्वर्वाङ् ।
अपसेधन् रक्षसो यातुधानानस्थाद् देवः प्रतिदोषं गृणानः ॥ १० ॥

ये ते पन्थाः सवितः पूर्व्यासोऽरेणवः सुकृता अन्तरिक्षे ।
तेभिर्नो अद्य पथिभिः सुगेभी रक्षा च नो अधि च ब्रूहि देव ॥ ११ ॥

## वाहता वारा : वायुसूक्त [१०.१६८, १०.१८६]

वातस्य नु महिमानं रथस्य रुजन्नेति स्तनयन्नस्य घोषः ।
दिविस्पृग्याति अरुणानि कुर्वन् उतो एति पृथिव्या रेणुमस्य ॥ १ ॥

सं प्रेरते अनु वातस्य विष्ठः ऐनं गच्छन्ति समना न योषाः ।
ताभिः सयुक्सरथं देव ईयते अस्य विश्वस्य भुवनस्य राजा ॥ २ ॥

अन्तरिक्षे पथिभिरीयमानो न नि विशते कतमच्चनाहः ।
अपां सखा प्रथमजा ऋतावा क्व स्विज्जातः कुत आ बभूव ॥ ३ ॥

आत्मा देवानां भुवनस्य गर्भो यथावशं चरति देव एषः ।
घो इदस्य शृण्विरे न रूपं तस्मै वाताय हविषा विधेम ॥ ४ ॥

वात आ वातु भेषजं शंभु मयोभु नो हृदे ।
प्र ण आयूंषि तारिषत् ॥ १ ॥

उत वात पितासि न उत भ्रातोत नः सखा ।
स नो जीवातवे कृधि ॥ २ ॥

यददो वात ते गृहेऽमृतस्य निधिर्हितः ।
ततो नो देहि जीवसे ॥ ३ ॥

❑

## गाईचं गाणं : गोसूक्त [१०.१६९]

मयोभूर्वातो अभि वातूस्रा ऊर्जस्वतीरोषधीरा रिशन्ताम् ।
पीवस्वतीर्जीवधन्याः पिबन्त्ववसाय पद्वते रुद्र मृळ ॥ १ ॥

याः सरूपा विरूपा एकरूपा यासामग्निरिष्ट्या नामानि वेद ।
या अङ्गिरसस्तपसेह चक्रुस्ताभ्यः पर्जन्य महि शर्म यच्छ ॥ २ ॥

या देवेषु तन्वमैरयन्त यासां सोमो विश्वा रूपाणि वेद ।
ता अस्मभ्यं पयसा पिन्वमानाः प्रजावतीरिन्द्र गोष्ठे रिरीहि ॥ ३ ॥

प्रजापतिर्मह्यमेता रराणो विश्वैर्देवैः पितृभिः संविदानः ।
शिवाः सतीरुप नो गोष्ठमाकस्तासां वयं प्रजया सं सदेम ॥ ४ ॥

# शेताजी सीताई : कृषिसूक्त [४.५७]

क्षेत्रस्य पतिना वयं हितेनेव जयामसि ।
गामश्वं पोषयित्वा स नो मृळाति ईदृशे ॥ १ ॥

क्षेत्रस्य पते मधुमन्तमूर्मिं धेनुरिव पयो अस्मासु धुक्ष्व ।
मधुश्चुतं घृतमिव सुपूतमृतस्य नः पतयो मृळन्तु ॥ २ ॥

मधुमतीरोषधीर्द्याव आपो मधुमन्नो भवत्वन्तरिक्षम् ।
क्षेत्रस्य पतिर्मधुमान्नो अस्तु अरिष्यन्तो अन्वेनं चरेम ॥ ३ ॥

शुनं वाहाः शुनं नरः शुनं कृषन्तु लाङ्गलम् ।
शुनं वरत्रा बध्यन्तां शुनमष्ट्रामुदिङ्गय ॥ ४ ॥

शुनासीराविमां वाचं जुषेथां यद्दिवि चक्रथुः पयः ।
तेनेमामुप सिञ्चतम् ॥ ५ ॥

अर्वाची सुभगे भव सीते वन्दामहे त्वा ।
यथा नः सुभगाससि यथा नः सुफलाससि ॥ ६ ॥

इन्द्रः सीतां नि गृह्णातु तां पूषानु यच्छतु ।
सा नः पयस्वती दुहामुत्तरामुत्तरां समाम् ॥ ७ ॥

शुनं नः फाला वि कृषन्तु भूमिं शुनं कीनाशा अभि यन्तु वाहैः ।
शुनं पर्जन्यो मधुना पयोभिः शुनासीरा शुनमस्मासु धत्तम् ॥ ८ ॥

❑

## जलदेवता [१.२३]

अम्बयो यन्त्यध्वभिर्जामयो अध्वरीयताम् ।
पृञ्चतीर्मधुना पयः ॥ १६ ॥
अमूर्या उप सूर्ये याभिर्वा सूर्यः सह ।
ता नो हिन्वन्त्वध्वरम् ॥ १७ ॥
अपो देवीरुप ह्वये यत्र गावः पिबन्ति नः ।
सिन्धुभ्यः कर्त्वं हविः ॥ १८ ॥
अप्स्वन्तरमृतमप्सु भेषजमपामुत प्रशस्तये ।
देवा भवत वाजिनः ॥ १९ ॥
अप्सु मे सोमो अब्रवीदन्तर्विश्वानि भेषजा ।
अग्निं च विश्वशंभुवमापश्च विश्वभेषजीः ॥ २० ॥
आपः पृणीत भेषजं वरूथं तन्वे मम ।
ज्योक् च सूर्यं दृशे ॥ २१ ॥
इदमापः प्रवहत यत् किं च दुरितं मयि ।
यदीं वाहमभिदुद्रोह यद् वा शेप उतानृतम् ॥ २२ ॥
आपो अद्यान्वचारिषं रसेन समगस्महि ।
पयस्वानग्न आ गहि तं मा संसृज वर्चसा ॥ २३ ॥

□

# पावसाच्या देवा : पर्जन्यसूक्त [५.८३]

अच्छा वद तवसं गीर्भिराभिः स्तुहि पर्जन्यं नमसा विवास ।
कनिक्रदद् वृषभो जीरदानू रेतो दधात्योषधीषु गर्भम् ॥ १ ॥

वि वृक्षान् हन्त्युत हन्ति रक्षसो विश्वं बिभाय भुवनं महावधात् ।
उतानागा ईषते वृष्ण्यावतो यत् पर्जन्यः स्तनयन् हन्ति दुष्कृतः ॥ २ ॥

रथीव कशयाश्वाँ अभिक्षिपन्नाविर्दूतान् कृणुते वर्ष्याँ अह ।
दूरात् सिंहस्य स्तनथा उदीरते यत् पर्जन्यः कृणुते वर्ष्यं नभः ॥ ३ ॥

प्र वाता वान्ति पतयन्ति विद्युत उदोषधीर्जिहते पिन्वते स्वः ।
इरा विश्वस्मै भुवनाय जायते यत् पर्जन्यः पृथिवीं रेतसावति ॥ ४ ॥

यस्य व्रते पृथिवी नंनमीति यस्य व्रते शफवज्जर्भुरीति ।
यस्य व्रत ओषधीर्विश्वरूपाः स नः पर्जन्य महि शर्म यच्छ ॥ ५ ॥

दिवो नो वृष्टिं मरुतो ररीध्वं प्र पिन्वत वृष्णो अश्वस्य धाराः ।
अर्वाङेतेन स्तनयित्नुनेह्यपो निषिञ्चन्नसुरः पिता नः ॥ ६ ॥

अभि क्रन्द स्तनय गर्भमा धा उदन्वता परि दीया रथेन ।
दृतिं सु कर्ष विषितं न्यञ्चं समा भवन्तूद्वतो निपादाः ॥ ७ ॥

महान्तं कोशमुदचा नि षिञ्च स्यन्दन्तां कुल्या विषिताः पुरस्तात् ।
घृतेन द्यावापृथिवी व्युन्धि सुप्रपाणं भवन्त्वघ्न्याभ्यः ॥ ८ ॥

यत् पर्जन्य कनिक्रदत् स्तनयन् हंसि दुष्कृतः ।
प्रतीदं विश्वं मोदते यत् किं च पृथिव्यामधि ॥ ९ ॥

अवर्षीर्वर्षमुदु षू गृभायाऽकर्धन्वान्यत्येतवा उ ।
अजीजन ओषधीर्भोजनाय कमुत प्रजाभ्योऽविदो मनीषाम् ॥ १० ॥

□

# वेडकांची प्रार्थना : मण्डूकसूक्त [७.१०३]

संवत्सरं शशयाना ब्राह्मणा व्रतचारिणः ।
वाचं पर्जन्यजिन्वितां प्र मण्डूका अवादिषुः ॥ १ ॥

दिव्या आपो अभि यदेनमायन् दृतिं न शुष्कं सरसी शयानम्
गवामह न मायुर्वत्सिनीनां मण्डूकानां वग्नुरत्रा समेति ॥ २ ।

यदीमेनाँ उशतो अभ्यवर्षीत् तृष्यावतः प्रावृष्यागतायाम् ।
अक्खलीकृत्या पितरं न पुत्रो अन्यो अन्यमुप वदन्तमेति ॥ ३ ॥

अन्यो अन्यमनु गृभ्णात्येनोरपां प्रसर्गे यदमन्दिषाताम् ।
मण्डूको यदभिवृष्टः कनिष्कन् पृश्निः संपृङ्क्ते हरितेन वाचम् ॥ ४

यदेषामन्यो अन्यस्य वाचं शाक्तस्येव वदति शिक्षमाणः ।
सर्वं तदेषां समृधेव पर्व यत् सुवाचो वदथनाध्यप्सु ॥ ५ ॥

गोमायुरेको अजमायुरेकः पृश्निरेको हरित एक एषाम् ।
समानं नाम बिभ्रतो विरूपाः पुरुत्रा वाचं पिपिशुर्वदन्तः ॥ ६ ॥

ब्राह्मणासो अतिरात्रे न सोमे सरो न पूर्णमभितो वदन्तः ।
संवत्सरस्य तदहः परि ष्ठ यन्मण्डूकाः प्रावृषीणं बभूव ॥ ७ ॥

ब्राह्मणासः सोमिनो वाचमक्रत ब्रह्म कृण्वन्तः परिवत्सरीणम् ।
अध्वर्यवो घर्मिणः सिष्विदाना आविर्भवन्ति गुह्या न के चित् ॥ ८ ॥

देवहितिं जुगुपुर्द्वादशस्य ऋतुं नरो न प्र मिनन्त्येते ।
संवत्सरे प्रावृष्यागतायां तप्ता घर्मा अश्नुवते विसर्गम् ॥ ९ ॥

गोमायुरदादजमायुरदात् पृश्निरदाद्धरितो नो वसूनि ।
गवां मण्डूका ददतः शतानि सहस्रसावे प्र तिरन्त आयुः ॥ १० ॥

# नदीसूक्त [१०.७५]

प्र सु व आपो महिमानमुत्तमं कारुर्वोचाति सदने विवस्वतः ।
प्र सप्तसप्त त्रेधा हि चक्रमुः प्र सृत्वरीणामति सिन्धुरोजसा ॥ १ ॥

प्र तेऽरदद्वरुणो यातवे पथः सिन्धो यद्वाजाँ अभ्यद्रवस्त्वम् ।
भूम्या अधि प्रवता यासि सानुना यदेषामग्रं जगतामिरज्यसि ॥ २ ॥

दिवि स्वनो यतते भूम्योपर्यनन्तं शुष्ममुदियर्ति भानुना ।
अभ्रादिव प्र स्तनयन्ति वृष्टयः सिन्धुर्यदेति वृषभो न रोरुवत् ॥ ३ ॥

अभि त्वा सिन्धो शिशुमिन्न मातरो वाश्रा अर्षन्ति पयसेव धेनवः ।
राजेव युध्वा नयसि त्वमित्सिचौ यदासामग्रं प्रवतामिनक्षसि ॥ ४ ॥

इमं मे गङ्गे यमुने सरस्वति शुतुद्रि स्तोमं सचता परुष्ण्या ।
असिक्न्या मरुद्वृधे वितस्तयार्जीकीये शृणुह्या सुषोमया ॥ ५ ॥

तृष्टामया प्रथमं यातवे सजूः सुसर्त्वा रसया श्वेत्या त्या ।
त्वं सिन्धो कुभया गोमतीं क्रुमुं मेहत्न्वा सरथं याभिरीयसे ॥ ६ ॥

ऋजीत्येनी रुशती महित्वा परि ज्रयांसि भरते रजांसि ।
अदब्धा सिन्धुरपसामपस्तमाऽश्वा न चित्रा वपुषीव दर्शता ॥ ७ ॥

स्वश्वा सिन्धुः सुरथा सुवासा हिरण्ययी सुकृता वाजिनीवती ।
ऊर्णावती युवतिः सीलमावत्युताधि वस्ते सुभगा मधुवृधम् ॥ ८ ॥

सुखं रथं युयुजे सिन्धुरश्विनं तेन वाजं सनिषदस्मिन्नाजौ ।
महान् ह्यस्य महिमा पनस्यतेऽदब्धस्य स्वयशसो विरप्शिनः ॥ ९ ॥

❑

# प्रार्थना वाटदेवाची : पूषा [१.४२]

सं पूषन्नध्वनस्तिर व्यंहो विमुचो नपात् ।
सक्ष्वा देव प्र णस्पुरः ॥ १ ॥

यो नः पूषन्नघो वृको दुःशेव आदिदेशति ।
अप स्म तं पथो जहि ॥ २ ॥

अप त्यं परिपन्थिनं मुषीवाणं हुरश्चितम् ।
दूरमधि स्रुतेरज ॥ ३ ॥

त्वं तस्य द्वयाविनोऽघशंसस्य कस्यचित् ।
पदाभि तिष्ठ तपुषिम् ॥ ४ ॥

आ तत्ते दस्र मन्तुमः पूषन्नवो वृणीमहे ।
येन पितॄनचोदयः ॥ ५ ॥

अधा नो विश्वसौभग हिरण्यवाशीमत्तम ।
धनानि सुषणा कृधि ॥ ६ ॥

अति नः सश्चतो नय सुगा नः सुपथा कृणु ।
पूषन्निह क्रतुं विदः ॥ ७ ॥

अभि सूयवसं नय न नवज्वारो अध्वने ।
पूषन्निह क्रतुं विदः ॥ ८ ॥

शग्धि पूर्धि प्र यंसि च शिशीहि प्रास्युदरम् ।
पूषन्निह क्रतुं विदः ॥ ९ ॥

न पूषणं मेथामसि सूक्तैरभि गृणीमसि ।
वसूनि दस्ममीमहे ॥ १० ॥

❑

# केसोबा : केशिसूक्त [१०.१३६]

केश्यग्निं केशी विषं केशी बिभर्ति रोदसी ।
केशी विश्वं स्वर्दृशे केशीदं ज्योतिरुच्यते ।। १ ।।

मुनयो वातरशनाः पिशङ्गा वसते मला ।
वातस्यानु ध्राजिं यन्ति यद्देवासो अविक्षत ।। २ ।।

उन्मदिता मौनेयेन वाताँ आ तस्थिमा वयम् ।
शरीरेदस्माकं यूयं मर्तासो अभि पश्यथ ।। ३ ।।

अन्तरिक्षेण पतति विश्वा रूपावचाकशत् ।
मुनिर्देवस्य देवस्य सौकृत्याय सखा हितः ।। ४ ।।

वातस्याश्वो वायोः सखाथो देवेषितो मुनिः ।
उभौ समुद्रावा क्षेति यश्च पूर्व उतापरः ।। ५ ।।

अप्सरसां गन्धर्वाणां मृगाणां चरणे चरन् ।
केशी केतस्य विद्वान्त्सखा स्वादुर्मदिन्तमः ।। ६ ।।

वायुरस्मा उपामन्थत्पिनष्टि स्मा कुनंनमा ।
केशी विषस्य पात्रेण यद्रुद्रेणापिबत्सह ।। ७ ।।

❑

## जुळ्या जोडीचे गाणे : अश्विनौ [२.३९]

ग्रावाणेव तदिदर्थं जरेथे गृध्रेव वृक्षं निधिमन्तमच्छ ।
ब्रह्माणेव विदथ उक्थशासा दूतेव हव्या जन्या पुरुत्रा ॥ १ ॥

प्रातर्यावाणा रथ्येव वीरा अजेव यमा वरमा सचेथे ।
मेनेइव तन्वाऽशुम्भमाने दम्पतीव क्रतुविदा जनेषु ॥ २ ॥

शृङ्गेव नः प्रथमा गन्तमर्वाक् छफाविव जर्भुराणा तरोभिः ।
चक्रवाकेव प्रति वस्तोरुस्रार्वाञ्चा यातं रथ्येव शक्रा ॥ ३ ॥

नावेव नः पारयतं युगेव नभ्येव न उपधीव प्रधीव ।
श्वानेव नो अरिषण्या तनूनां खृगलेव विस्त्रसः पातमस्मान् ॥ ४ ॥

वातेवाजुर्या नद्येव रीतिरक्षीइव चक्षुषा यातमर्वाक् ।
हस्ताविव तन्वे शंभविष्ठा पादेव नो नयतं वस्यो अच्छ ॥ ५ ॥

ओष्ठाविव मध्वास्ने वदन्ता स्तनाविव पिप्यतं जीवसे नः ।
नासेव नस्तन्वो रक्षितारा कर्णाविव सुश्रुता भूतमस्मे ॥ ६ ॥

हस्तेव शक्तिमभि संददी नः क्षामेव नः समजतं रजांसि ।
इमा गिरो अश्विना युष्मयन्तीः क्ष्णोत्रेणेव स्वधिति सं शिशीतम् ॥ ७ ॥

एतानि वामश्विना वर्धनानि ब्रह्म स्तोमं गृत्समदासो अक्रन् ।
तानि नरा जुजुषाणोप यातं बृहद्वदेम विदथे सुवीराः ॥ ८ ॥

# रात्रमाउली : निशासूक्त [१०.१२७]

रात्री व्यख्यदायती पुरुत्रा देव्यक्षभिः ।
विश्वा अधि श्रियोऽधित ॥ १ ॥

ओर्वप्रा अमर्त्या निवतो देव्युद्वतः ।
ज्योतिषा बाधते तमः ॥ २ ॥

निरु स्वसारमस्कृतोषसं देव्यायती ।
अपेदु हासते तमः ॥ ३ ॥

सा नो अद्य यस्या वयं नि ते यामन्नविक्ष्महि ।
वृक्षे न वसतिं वयः ॥ ४ ॥

नि ग्रामासो अविक्षत नि पद्वन्तो नि पक्षिणः ।
नि श्येनासश्चिदर्थिनः ॥ ५ ॥

यावया वृक्यं वृकं यवय स्तेनमूर्म्ये ।
अथा नः सुतरा भव ॥ ६ ॥

उप मा पेपिशत् तमः कृष्णं व्यक्तमस्थित
उष ऋणेव यातय ॥ ७ ॥

उप ते गाइवाकरं वृणीष्व दुहितर्दिवः ।
रात्रि स्तोमं न जिग्युषे ॥ ८ ॥

□

## विश्वकर्मा [१०.८१]

या इमा विश्वा भुवनानि जुह्वदृषिर्होता न्यसीदत्पिता नः ।
स आशिषा द्रविणमिच्छमानः प्रथमच्छदवराँ आ विवेश ॥ १ ॥

किं स्विदासीदधिष्ठानमारम्भणं कतमत्स्वित्कथासीत् ।
यतो भूमिं जनयन्विश्वकर्मा वि द्यामौर्णोन्महिना विश्वचक्षाः ॥ २ ॥

विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो विश्वतोबाहुरुत विश्वतस्पात् ।
सं बाहुभ्यां धमति सं पतत्रैर्द्यावाभूमी जनयन्देव एकः ॥ ३ ॥

किं स्विद्वनं क उ स वृक्ष आस यतो द्यावापृथिवी निष्टतक्षुः ।
मनीषिणो मनसा पृच्छतेदु तद्यदध्यतिष्ठद्भुवनानि धारयन् ॥ ४ ॥

या ते धामानि परमाणि यावमा या मध्यमा विश्वकर्मन्नुतेमा ।
शिक्षा सखिभ्यो हविषि स्वधावः स्वयं यजस्व तन्वं वृधानः ॥ ५ ॥


विश्वकर्मन् हविषा वावृधानः स्वयं यजस्व पृथिवीमुत द्याम् ।
मुह्यन्त्वन्ये अभितो जनास इहास्माकं मघवा सूरिरस्तु ॥ ६ ॥

वाचस्पतिं विश्वकर्माणमूतये मनोजवं वाजे अद्या हुवेम ।
स नो विश्वानि हवनानि जोषद् विश्वशंभूरवसे साधुकर्मा ॥ ७ ॥

❑

## || वेदातली गाणी ||

मराठमोळ्या अनुवादात उतरलेला
वेदातल्या जीवनाचा उद्गार |
वारली चितरणात, नुसते विषय ऐकून
उमटलेला त्या जीवनाचा व्यवहार |




संमत

| | | |
|---|---|---|
| नाटके | : | एकलव्य । वंशाचा व्यास । युरेका । |
| गाणी | : | युगाणी । अक्षरे । इमराठी गाणी । |
| भाषिक | : | अडगुलं मडगुलं । मराठी भाषेचे मूळ । |
| संस्कृतिक | : | द्रविड महाराष्ट्र । भारतीय मिथ्यांचा मागोवा ज्ञानेश्वरांचे चमत्कार । |